स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण, स्वदेशाचे एकीकरण

यासाठी मित्रांनो ! चला....

२७ जानेवारी १९६८

चाळीस पैसे

# माणूस



## केवढी ही भव्य परंपरा !

मराठवाडा परिसरातील
शिवपूर्वकालातील
राज्यक्रांत्यांचे आणि समाजक्रांत्यांचे
स्वैर विहंगमावलोकन

**प्रा. पंढरीनाथ रानडे**

## वेरूळ ते औरंगाबाद अर्थात् खडकी

अन्नसंचलनाचे चलच्चित्रण

**सादरकर्ते : विजय तेंडुलकर**

भरघोस साहित्य । भरपूर छायाचित्रे ।
पृष्ठसंख्या सुमारे शंभर । किंमत एक रुपया ।

## 'माणूस' संचलन विशेषांक

प्रसिद्धि : दिनांक १७ फेब्रुवारी १९६८

- दि. ३ व १० फेब्रुवारी अंक बंद राहतील.
- विक्रेत्यांनी कमीजास्त मागणी अवश्य त्या आर्थिक तरतुदींसह त्वरित नोंदवावी.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पस्तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. १५-१-६८

आपण जे नवविचार आपल्या साप्ताहिकातून देता ते काहींना मूर्खपणाचे व अव्यवहारी वाटत असले तरी उद्या समाजाला त्यांचा विचार करावाच लागेल.

आमच्या शासनाला अमेरिकेतील मान्सूनची चिंता असते. जपानमध्ये भाताचे पीक चांगले झाले की, ह्यांना दिलासा मिळतो. परंतु देशातील प्रचलित साधनाचा उपयोग करून आपले उत्पादन कसे वाढवता येईल हा विचारही त्यांच्या मनात येत नाही.

मी स्वत: कनिष्ठ दुग्धाधिकारी म्हणून आर्वी दुग्ध केंद्रात काम करत आहे. आमच्यात जोम आहे, उत्साह आहे. पण योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे माझ्यासारखा तरुण वैफल्याने ग्रासला आहे.

शारंग जंगम
(आर्वी)

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण
स्वदेशाचे एकीकरण
यासाठी मित्रांनो ! चला

# श्रीकैलास ते सिंधुसागर

यंदा सर्वत्र पीकपाणी चांगले आहे. अवेळचा पाऊस, थंडीवारा, गारपीट या सर्व आपत्ती गृहीत धरूनही एकंदरीत देशाची अन्नपरिस्थिती आशादायक आहे. परकीय अन्न-मदतीचे दोर तोडून टाकण्याची एक फार दुर्मिळ संधी चालून आली आहे. आपण तिचा पुरेपूर लाभ उठवला पाहिजे. यापुढे आर्थिक, सामाजिक व नैतिक यांपैकी कोणत्याही भूमिकेवरून

फुकटच्या मिळणाऱ्या अन्नमदतीचा आपण स्वीकार करणे असमर्थनीय आहे; आपल्या राष्ट्रीय प्रतिष्ठेला अशोभनीय आहे; स्वतंत्र अस्तित्वाला धोकादायकही आहे. अशा प्रकारच्या मदतीमुळे सर्व समाजात एकप्रकारची न्यूनगंडाची भावना फैलावत चालली आहे व आपला परधार्जिणेपणाही विनाकारण वाढत आहे. लहानसहान प्रगतीसाठी किंवा प्रगतीच्या आभासासाठीही आपण परक्यांवर अवलंबून राहू लागलो आहोत. यापुढे ही वृत्ती अशीच वाढू दिली, आपल्या भिक्षांदेही धोरणावर कडाडून हल्ला चढवला नाही तर आपली राष्ट्रीय अस्मिताच मरगळून नष्ट होण्याची फार शक्यता आहे. ही शक्यता टळावी, सर्वांचे या अन्नमदतीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांकडे लक्ष वेधावे व त्याचबरोबर सर्वसामान्य भारतीय नागरिकाला या हातपसरू व पळकाढू धोरणाबद्दल वाटणारा विलक्षण तिटकारा व चीडही व्यक्त करावी ही या अन्नसंचलनामागील भूमिका आहे.

संचलन-सैनिकांचे मागणे काहीच नाही; सांगणे मात्र हे आहे, की निदान अन्नमदत तरी ताबडतोब थांबवा. परान्नावर आश्रितासारखे जगणे आम्हाला नामंजूर आहे. आहे ते अन्न जरी नीट राखले आणि सारखे वाटून घेतले तरी बरीचशी अन्नतूट कमी होईल. एवढी जबाबदारी तरी चोख सांभाळा. आणि हे सगळे करून थोडीफार तूट राहिलीच तर आम्ही सर्वजण ती आनंदाने सहन करू. पण लाचारीचे हे लाजिरवाणे जिणे यापुढे आता एक क्षणही आमच्या माथी मारू नका.'

हे सांगणे सर्वांनी एकत्र येऊन, एका सर्वमान्य राष्ट्रीय व्यासपीठावरून सांगावे यासाठी हे संचलन आहे. अन्नासारख्या मूलभूत प्रश्नाकडेसुद्धा पक्षनिरपेक्ष, प्रांतभाषाजातिधर्मनिर-

पेक्ष, वर्गमुक्त दृष्टिकोनातून पाहणे आपल्याला जमू शकणार नसेल तर निकोप लोकशाही आणि प्रबळ राष्ट्रभावना या भूमीत रुजेल, वाढेल याची शाश्वती नाही. पाच वर्षांतून एकदा मतदान करून लोकशाहीतील नागरिकांची कर्तव्ये संपत नसतात आणि स्वतंत्र होऊन वीस वर्षे उलटल्यावरही जो देश अन्नासारख्या प्राथमिक गरजेबाबत दुसऱ्यावर विसंबून राहतो त्याच्या राष्ट्रीय गर्जितांनाही फारसा अर्थ नसतो. हे दोन्ही शब्द आज निष्प्राण आहेत. त्यांना प्राणफुंकर घालणे ही या घटकेची निकड आहे. यासाठी मित्रांनो ! आज आपण सारे येथे जमलेले आहोत.

चैतन्याने रसरसलेला हा ऐतिहासिक परिसर आहे. दिवसही तसाच. भाग्याची गोष्ट आहे, येथे आपण सर्व थरातले, सर्व पक्षोपपक्षांचे, अक्राणीच्या निरक्षर गिरिजनांपासून पुण्यामुंबईच्या नामांकित अक्षरपंडितांपर्यंत सारेजण एकत्रित येत आहोत. स्त्रिया आहेत, मुले आहेत, तरुण विद्यार्थी आहेत, समंजस प्रौढही आहेत. सर्वांची आकांक्षा एकच आहे—स्वतंत्र आहोतच. स्वयंपूर्णही होऊ. ऋणमुक्त जिणे जगू. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बोकाळलेला ऐतखाऊ मिंधेपणा आपल्या अंतःस्फूर्तीच्या जोरावर नाहीसा करू. स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण करू आणि यातूनच स्वदेशाचे एकीकरण साधू. अन्न हा आपला एक वस्तुपाठ आहे. असे वस्तुपाठ देत आणि घेत आपण पुढेपुढे जाऊ. अशा आजच्या असंख्य लहानलहान जाण्यातूनच कदाचित् एकात्म भारताचे उद्याचे मोठे शिल्प साकार होणार असेल. या शिल्पाच्या भव्य उभारणीसाठी, मित्रांनो ! चला.

**श्रीकैलास ते सिंधुसागर**


श्री. ग. माजगावकर

# कार्यक्रम

## दि. २६ जानेवारी ते १८ फेब्रुवारी १९६८

| | |
|---|---|
| दि. २६ जानेवारी : श्रीकैलास | संचलन आरंभ : दुपारी चार<br>मंत्रघोष, ध्वजवंदन, गीत.<br>भूमिकेचे निवेदन : श्री. ग. माजगावकर<br>पुरस्कार : श्री. ना. ग. गोरे |
| दि. २६ जानेवारी : वेरूळ | प्रकट सभा : सायंकाळी सहा<br>प्रमुख सहभाग : श्री. अनंतराव भालेराव |
| दि. २६ जानेवारी : वेरूळ | प्रवचन : रात्रौ नऊ<br>ह. भ. प श्री. धुंडामहाराज |
| दि. २७ जानेवारी : खुलदाबाद | प्रमुख सहभाग : श्री. चंद्रगुप्त चौधरी |
| दि. २८ „ : देवगिरी | „ „ : श्री. वसंतराव देशपांड |
| दि. २९।३० „ : औरंगाबाद | „ „ : डॉ. वि. म. दांडेकर |
| | „ „ : जॉर्ज फर्नांडिस |
| दि. ३१ जानेवारी : चितेगाव | दि. ९ „ : शेवगाव |
| दि. १ फेब्रुवारी : बिडकीन | दि १० „ : जोहरापूर |
| दि. २ „ : ढोरकीन | दि. ११ „ : गुंफा |
| दि. ३ „ : इसरवाडी | दि. १२ „ : भोसगाव |
| दि. ४ „ : आपेगाव | दि. १३ „ : कुकाणा |
| दि. ५।६ „ : पैठण | दि. १४ „ : भेंडा |
| दि. ७ „ : कऱ्हेटाकळी | दि. १५ „ : सौंदळा |
| दि. ८ „ : घोटण | दि. १६ „ : हिवरा |

दि. १७।१८ फेब्रुवारी : नेवासे



# वेरुळ

## दर्शन-दिग्दर्शन

दख्खनच्या कातळातून प्रकटलेले महाकाव्य वेरुळच्या डोंगरात आजही ताठ मानेने उत्तिष्ठ आहे! भारताच्या क्षितिजांवर उगवणाऱ्या व मावळणाऱ्या सूर्याला रोज सांज-सकाळी अर्घ्यप्रदान करण्याची कृतार्थता आणखी कुणाच्या वाट्याला आली असो अथवा नसो – एलापुर-मस्थित 'श्री कैलास' ही कामगिरी गेली बारा शतके बजावीत आहे.

श्री. कैलास म्हणजे भारतीय शिल्पकलेचे अत्युच्च शिखर.

**कैलास लेणे म्हणजे सह्याद्रीच्या कातळात साकार झालेले मध्ययुगीन महाराष्ट्राचे महाकाव्य. जगाच्या पाठीवरील कुठल्याही रसिकाला विस्मय-चकित करणारा शिल्पचमत्कार म्हणजे कैलास. दख्खनच्या कारागिरांनी येथे ब्रह्मांडाला गवसणी घालणारा उद्योग करून ठेवला आहे.**

एलापुरम म्हणजेच वेरुळ. एलापुरमच्या डोंगराने काय बघितले नाही ? पृथ्वी-तलावरील सर्वांत प्राचीन पर्वत जो सह्याद्री त्याची एक धाकटी पात म्हणजे एला-पुरमचा डोंगर. पृथ्वीमातेच्या लेकरांची सर्व कौतुके एलापुरमच्या डोंगराने न्याहा-ळली आहेत.

आदि मानवाच्या दगडी हत्यारांच्या फेकी, धनुष्याचे टणत्कार आणि त्याची स्थलांतरांची उड्डाणे एलापुरम डोंगराच्या नजरेतून सुटली नसतील. पण त्या गोष्टी झाल्या फार जुन्या ! अगदी अलीकडच्या म्हणजे गेल्या दोन अडीच सहस्र वर्षांतल्या भारतीय इतिहासातील सर्व उलथापालथी एलापुरम्च्या साक्षीने घडल्या आहेत. मगधराज चंद्रगुप्त मौर्याचे सैन्य खाली दक्षिणेकडे निघाले तेव्हा ते उज्जैनी–महिष्मती–अजिंठा–वेरुळ–पैठण–मार्गेच कांचीला गेले असावे.

उज्जैनी ते पैठण व सोपारे ते कांचीपुरम या मार्गाने जाणाऱ्या सार्थवाहांनी आपण ऐकलेले सातवाहन राजपुरुषांचे व राण्यांचे पराक्रम येथील मुक्कामात एला-पुरमला निश्चितच सांगितले असतील.

वाकाटक नृपतीची गुप्तकुलोत्पन्ना राणी प्रभावती गुप्ता हिने आपल्या नातवा-साठी कुंतलेश्वराची युवराज्ञी अजितभट्टारिका हिला मागणी घालण्यासाठी जो कालिदास नावाचा एक दूत पाठविला होता तो आपल्या दक्षिणेतील प्रवासात एलगंगेच्या ओहळापाशी काही घटका विसावला नसेल असे कोण म्हणेल ?

उत्तरापथपती हर्षवर्धनाचा नर्मदेच्या उत्तरेला पराभव करणाऱ्या पुलकेशिन चालुक्याने गोदाकाठच्या सनिकाची पहिली मानवंदना स्वीकारली असावी ती बहुधा येथेच !

**राष्ट्रकूट शुभतुंग कृष्ण ह्याने गंगायमुना पार करून कृष्णा-गोदा यांचे उदक जेव्हा नगाधिराज हिमालयाला वाहिले तेव्हा 'एलापुरम्'चे अंग प्रत्यंग पुलकित झाले असावे, कृष्णा-गोदा ह्यांनी हिमालयाला – कलासाला वाहिलेली उदकांजली**

— — — — — — —

प्रा. पंढरीनाथ रानडे

— — — — — — —

२७ जानेवारी १९६८

म्हणजे भारतीय इतिहासातील केवढा अपूर्व क्षण ! केवढा हृदयस्पर्शी हा प्रसंग ! हा क्षण, हा प्रसंग भारतीय इतिहासाचा एक अमोल ठवा ! हा ठेवा वाया जाऊ देता कामा नये, वठता कामा नये म्हणून भारतीय कलावंताचे मन व्याकुळ झाले. दिक्कालाला झुगारून देऊन चिरंतनाशी स्पर्धा करील अशी एखादी शिल्पवास्तू दख्खनच्या कातळात बुडवायची असा संकल्प सोडण्यात आला.

राष्ट्रकूट-नृपती शुभतुंग कृष्णराजाने महाराष्ट्रातील सर्व शिल्पकारांना – सेलवाढिकांना पाचारण केले. सर्वांना निमंत्रणे गेली. हरप्पा आणि मोहंजदारो, सारनाथ आणि सांची, तक्षशिला आणि अमरावती, कार्ले आणि कोंडाणे, कांची आणि मथुरा, भाजे आणि उदयगिरी, घारापुरी आणि बदामी या भारतीय शिल्पाच्या परंपरांना निमंत्रण गेले – तुम्ही सर्व या ! सिंधू खोऱ्यातील रूपकांनो, आपल्या उठावदार घनाकारासह या ! सारनाथच्या सिंहांनो, आपल्या झेपेसह या ! सांचीच्या शालभंजिकांनो, आपल्या मांसल देहसौष्ठवासह या ! तक्षशिलेच्या बुद्धांनो, आपल्या रूपसंपदेसह या ! मथुरेच्या बुद्धांनो, आपल्या आत्मिक अनुशीलनासह या ! उदयगिरीच्या प्रतिमांनो, आपल्या पराक्रमासह या ! कोंडाण्याच्या नि पितळखोऱ्याच्या यक्षांनो आपल्या समृद्धीसह या ! कार्लभाजाच्या चैत्य कमानींनो, आपल्या डौलासह या ! कांची पट्टडीकलच्या मंदिरशिखरांनो, आपल्या गोपुरांसह या ! घारापुरीच्या रुद्रांनो, आपल्या तांडवासह या ! बदामीच्या त्रिविक्रमांनो, आपल्या ओजासह या !

महाराष्ट्राच्या वतीने हे आमंत्रण शुभतुंग कृष्णाने भारतीय शिल्पकारांना दिले. आणि केवढा चमत्कार घडला ! महाराष्ट्राच्या आवाहनाला भारताच्या कोनाकोपऱ्यांतून साद मिळाली. आणि ‘कैलास’ घडविला गेला !

## महाराष्ट्रीय शैल शिल्पाची अपूर्वता

सह्याद्रीच्या डोंगरात महाराष्ट्रातील कलावंतांनी जी शिल्पसृष्टी कोरून ठेवली आहे ती बघून कुणाही रसिकाच्या तोंडून ‘दुजी सृष्टी जे हे केले तुम्ही – ते पाहोनी हासो आम्ही विश्वामित्राते’ असे उद्‌गार सहजगत्या बाहेर पडतात. व अजिंठा-वेरुळ, पितळखोरे, कार्ले, भाजे, कोंडाणे, घारापुरी, जुन्नर, कान्हेरी आणि नाशिक येथील शैलगृहांतून हिंडताना देवागंधर्वांची आणि स्वप्नांची नगरे दख्खनच्या कुशीत वसतीला आली आहेत, असा भास रसिक दर्शकाला होतो.

छिन्नीच्या आघाताने दगडाला विविध कंगोऱ्यांनी रूपांतरित करून त्यांत मानवी जीवनाची विविध रूपे घडविण्याचे कृत्य विस्मयकारक आहे म्हणूनच की काय अद्‌भुत असा अर्थ ध्वनित करणारी शिल्प ही संज्ञा मूर्तिकलेसाठी वापरण्यात आली असावी !

छिन्नीच्या आघाताने समजूतदारपणाने आकार घेणारा सह्याद्रीचा कातळ हे प्राचीन महाराष्ट्रातील शिल्पाचे माध्यम. महाराष्ट्रातील शिल्पकला पहिल्या-वहिल्यांदा बहरली ती 'सेलवाढिकांनी' सह्याद्रीच्या डोंगररांगांत कोरून काढलेल्या लेण्यांत.

दख्खनच्या कातळात कोरली गेलेली लेणी जागतिक वस्तुशिल्पकलेच्या इतिहासातील एक अद्वितीय पर्व आहे. इजिप्त, असीरिया, ग्रीस आणि रोम या प्राचीन देशांतही शैलशिल्पाची परंपरा आहे. परंतु महाराष्ट्रातील शैलशिल्पाची सर यांपैकी कुणालाही येणार नाही. भारतात महाराष्ट्राबाहेरही बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा या प्रदेशांत डोंगरांत कोरून काढलेली लेणी आहेत पण सह्याद्रीच्या शैल-गृहात आढळून येणारी भव्यता, विविधता आणि शिल्पकलेची परिणत अवस्था तिथे नाही.

ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर बाराव्या शतकापर्यंत शैलशिल्पाची परंपरा बौद्ध, जैन आणि ब्राह्मणी कलावंतांनी महाराष्ट्रात सजीव करून सोडली. महाराष्ट्रातील राजे, महारठी, महाभोज, सार्थवाह, श्रेष्ठ, लोहवाणिज, मालाकार, गृहपती, हलिक, सुवर्णकार आणि त्यांच्या घरधनिणी यांच्या प्रेरणेने मराठी 'सेल-वाढिकांनी' या शिल्पविश्वाची उभारणी सह्याद्रीच्या कातळात केली. सातवाहन कालापासून तो थेट यादवकालापर्यंत महाराष्ट्रातील कलावंतांच्या साठ—सत्तर पिढ्यांनी आपल्या छिन्न्या दख्खनच्या कातळावर बिजलीच्या चापल्याने चालवून, सोने अगर मेण ही यांवर होणार नाही इतके सुबक व नाजूक शिल्पकाम घडविले.

शिल्प आणि स्थापत्य हे राष्ट्राच्या प्रतिभेचे मानदंड असतात. कोणत्याही संपन्न राष्ट्राच्या कर्तृत्वाची उंची मोजायची झाल्यास या मानदंडांचा उपयोग जाणते विवेचक करीत असतात. भारताच्या राष्ट्रीय प्रतिभेची सर्वांगीण छाननी करून श्री. अरविन्दो यांनी निष्कर्ष काढला तो असा की, महाप्रमाण चैतन्य, उत्तुंग मेधा आणि सखोल आध्यात्मिकता यांचा संगम होऊन भारतीय राष्ट्रीय प्रतिभा फुलली आहे.

चैतन्य, मेधा आणि आध्यात्मिकता ही भारतीय प्रतिभेची नेमकी वैशिष्टये वेरुळ लेण्यांमधील कातळाकातळातून पाझरली आहेत.

वेरुळ येथील लेणी ही ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत या कालखंडात कोरली गेली असावी असा तज्ज्ञांचा कयास आहे.

वेरुळच्या डोंगरात बौद्ध, ब्राह्मणी व जैन या तिन्ही भारतीय संप्रदायांची कला-विश्वे सामावली आहेत. येथील प्रमुख अशा चौतीस लेण्यांपैकी पहिली बारा लेणी बौद्ध, पुढील सतरा लेणी ब्राह्मणी व शेवटची पाच लेणी जैन आहेत.

**सात्त्विकता, आक्रमकता आणि विलासप्रियता या तिन्ही प्रवृत्तींचा आविष्कार वेरुळ येथे अनुक्रमे बौद्ध, ब्राह्मणी आणि जैन शिल्पांत बघा-वयास मिळतो.**

२७ जानेवारी १९६८

सारनाथ, मथुरा आणि गांधार येथील शिल्पविश्वांत जेव्हा थकवा आणि क्षीणत्व यांची चिन्हे दिसू लागली त्याच वेळी दक्षिणापथातील शिल्पविश्वात एक विलक्षण चैतन्य आणि आवेग यांची ऊर्मी उसळली. या ऊर्मीतूनच अजिंठा, वेरुळ, घारापुरी, राजतडाग (औरंगाबाद) येथील शैलरूपके आकाराला आली. बदामी, ऐहोळी, पत्तडीकल, महाबलिपुरम ही दक्षिणेतील कलाकेंद्रेही या लाटेने प्रभावित झाली.

वेरुळचे शिल्पविश्व सहस्रावधी रूपकांनी गजबजून गेले आहे. आकाश, पाताळ आणि पृथ्वी या तिन्ही लोकांत जेवढे म्हणून सचेतन विश्व आहे त्याचे उभ, आडवे आणि सखोल दर्शन येथील शिल्पसृष्टीत घडविले गेले आहे. देव आणि दानव, सुष्ट आणि दुष्ट, जन्म आणि मृत्यू, जय आणि पराजय, हसू आणि आसू, त्वेष आणि क्लेष यांची सहस्रावधी द्वंद्वे येथील शिल्पकारांनी घनाकारात उभी केली आहेत. स्त्री-पुरुषांची दैवी आणि मानुषी प्रारब्धे ही तर येथील कलावंतांची मुख्य कथावस्तू. या विराट कथावस्तूने वेरुळच्या शिल्पविश्वात जी विविधता, भव्यता आणि वेधकता आली आहे ती इतरत्र कुठल्याही कलाकेंद्रात आढळत नाही. त्यामुळे वेरुळचे शिल्प म्हणजे जागतिक शिल्पसृष्टीतील एक प्रचंड गारुड ठरले आहे

महाकाय रूपके, त्या रूपकांतून ओसंडत असलेला आवेग आणि गतिमानता ही वेरुळ येथील शिल्पाची आगळी वैशिष्ट्ये आहेत. रेखांच्या लयींनी घनाकारांना त्रिमितांत घडवून आणून येथल्या कलावंतांनी शिल्पात विलक्षण जिवंतपणा आणला आहे. याशिवाय रूपकांचे अंतरंग व्यक्तविण्याचे इथल्या कलावंतांचे कौशल्य अपूर्व आहे.

वेरुळ येथील बौद्ध लेणी ही महायानपंथीय आहेत. येथील बौद्ध शिल्पे ही बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आत्म्याशी सामंजस्य साधणारी आहेत हे कुणाही चोखंदळ दर्शकाला क्षणार्धात जाणवते. करुणा, प्रज्ञा आणि शील यांची प्रगाढ झाक येथील बौद्ध प्रतिमांवर आहे. या लेण्यांतील अवलोकितेश्वर आणि मंजुश्री पद्मपाणी आणि वज्रपाणी यांची बहुतेक सर्व रूपके महाकाय आहेत. यांच्या शिरावरील मुकुटांचे रेखाटन करताना येथील कलावंतांनी विशेष कौशल्य दाखविले आहे. मौक्तिक यज्ञोपवीत, हातातील कंकणे आणि गळ्यातील माळा याव्यतिरिक्त या रूपकांवर फारसे अलंकार नाहीत. अंगावरचे वस्त्र कोरीव आणि बाह्यरेषांनी दाखवलेले व अंगाला अगदी बिलगलेले असते, त्यामुळे रूपकाची भव्य व सौष्ठवपूर्ण शरीरयष्टी दृष्टीत भरते.

बौद्ध मंदिरातील मुख्य गाभाऱ्यात सिंहासनावर बसलेली धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बुद्धाची मूर्ती बहुतेक लेण्यांत आहे. बुद्धाच्या मूर्ती महाकाय आहेत. देहावयवांच्या बारकाव्यांचे रेखाटन न करता शिल्पकाराने साध्या मोकळ्या बाह्यरेषांच्याद्वारे प्रतिमेत जो भव्यतेचा ठसा उमटविला आहे तो प्रेक्षकांच्या मनावरही उमटल्याखेरीज राहत नाही.

येथील तारा, महामयूरी आदी बौद्ध देवतांच्या मूर्ती आकाराने मोठ्या असूनही

रूपसंपन्न आहेत; त्यांच्या देहावयवांतील कमनीयता कुठेही कमी झालेली नाही.

बौद्ध लेण्यांपैकी १० वे लेणे विश्वकर्मा लेणे या नावाने ओळखले जाते. हे लेणे म्हणजे महायान चैत्य होय. या चैत्याची आंतरबाह्य रचना साजशृंगाराने नटलेली आहे. कार्ले येथील चैत्यात जे स्वैर सौंदर्य आहे, कार्ले येथील गवाक्ष कमानीत रेखांचा जो अनिर्बंध झेपावणारा संचार आहे तसे येथे काहीही नाही ! या चैत्यात सर्व कसे आखीव आहे. या लेण्याच्या दर्शनीय भागात सूर्य गवाक्षावर जी कमान-रूपी त्रिदळ मेहरप आहे ती म्हणजे चैत्य कमानीचे अंतिम रेखाटन. कलाकुसरीने एवढी मढवलेली चैत्य कमान इतर कुठेही नाही. कमानीच्या बाजूला गंधर्व आणि अप्सरा यांच्या शरीराची ढब अशी काही रेखाटण्यात आली आहे की, हे गंधर्व जणू तारांगणाकडे झेप घेत आहेत असे वाटते.

या चैत्याच्या दागोबाच्या पुढयात सोळा फूट उंचीच्या बुद्ध मूर्ती असून तिच्या दोन्ही बाजूंना पद्मपाणी व वज्रपाणी आहेत. या तिन्ही रूपकांच्या चेहऱ्यांवरील भाव प्रबुद्धतेच्या अथांग जलाशयात बुडून गेले असल्याचे जाणवते. या बुद्धत्रयीचे पहिले दर्शन कार्ले येथे घडते तर या त्रयीचे अंतिम रूप आपणास वेरूळला घडते.

वेरुळ येथील ब्राह्मणी लेणी म्हणजे भारतीय शिल्पकलेचे एक अतिभव्य दिव्य प्रदर्शन. येथील बहुतेक सर्व ब्राह्मणी लेणी शैवपंथीय आहेत. पण शिवमंदिरात वैष्णव शिल्पेही आहेत. शिव आणि विष्णू, पार्वती आणि लक्ष्मी यांची असंख्य रूपके वेरुळच्या शिवमंदिरात आहेत. पुराणांतील अनेक नाट्यपूर्ण आणि भावस्पर्शी कथानकांनी येथील कलावंतांना निर्मितीची प्रेरणा दिली आहे. महेशाचे व विष्णूचे सौम्य तसेच रौद्ररूप आपणांस असंख्य रूपकांमधून बघावयास मिळते.

दिक्कालही ज्याला अटक करू शकले नाहीत असे महाराष्ट्रीय योद्धयांचे पौरुष त्रिपुरांतक देवदेवेश्वराच्या रूपाने वेरुळ येथे प्रकटले आहे. तद्वतच मराठी कवी आणि कलावंत यांच्या मनांतील कोमल आणि सौम्य भावना नटराज शिवाच्या ललित नृत्यांतून वेरुळला साकार झाल्या आहेत

## शिल्पश्रेष्ठ

वेरुळ येथील दशावतार लेण्यात भारतीय शिल्पप्रतिमेचा सर्वश्रेष्ठ हुंकार आपणांस ऐकावयास मिळतो.

या लेण्यांतील हिरण्यकश्यपुवधाचे शिल्प हे भारतीय शिल्पविश्वातील काही अपूर्व शिल्पांपैकी एक होय हे सर्व मर्मज्ञांनी मान्य केले आहे. पौराणिक कथाविश्वातील एक विलक्षण खळबळजनक प्रसंग येथील कलावंतांनी मोठ्या नाट्यपूर्ण पद्धतीने रेखाटला आहे. हिरण्यकश्यपूवर झेपावणारा नरसिंह चवताळलेला असून त्यांच्या अंगप्रत्यंगातून आवेश त्वेष ओसंडत आहे. नरसिंहाचा आवेश, त्याचा क्रोध, त्याची झेप कलावंताने अद्भुत कौशल्याने आणि सहजपणे व्यक्त केली आहे. नरसिंहाची

[पृष्ठ ५७ वर]

# रातराणी

संयुक्त नट संघ आपल्याकडेच असतात अशी उगीच माझी परवा परवापर्यंत कल्पना होती.

असा एक 'संघ' नुकताच इंग्लंडहून कलकत्तामार्गे मुंबईत आला. दोन इंग्रजी नाटकांचे अनेक प्रयोग त्याने केले. यांतले एक नाटक होते मरहूम बर्नार्ड शॉ साहेबाचे 'मिस्‌अलायन्स' नामक. दुसरे होते हॅरॉल्ड पींटर नामक नव्या दमाच्या आजच्या इंग्लिश नाटककाराचे. 'बर्थडे पार्टी' त्याचे नाव.

## मिस्‌अलायन्स

या दोन नाटकांच्या प्रयोगांसाठीच या केम्ब्रिजच्या प्रॉस्पेक्ट प्रॉडक्शन्स नामक संस्थेने ही सर्व नट ( आणि नटी ) मंडळी एकत्र आणली होती; आणि हे प्रयोग संपताच पुन्हा आपण सर्वजण चौ दिशा पांगणार असे या मंडळीने मला सांगितले. हे सर्व नट 'फ्री लान्सर्स' म्हणजे कुठेही नोकऱ्या न करता केवळ तेवढया तेवढयापुरते एकेका नाटकात काम करून मोकळे होणारे होते–थोडक्यात म्हणजे इंग्लंडमधले हे 'नायटे' होते. ('नाइट'पुरते वेतन घेणारे ते नायटे ही आपली व्याख्या. कंपनीच्या पदरी न राहता केवळ कराराने एकेका नाटकापुरते काम करणारे ही इंग्लंडमधली व्याख्या.) इंग्लंडमध्ये बहुसंख्य धंदेवाईक नट असेच जगतात असेही या मंडळीकडून कळले. पण या जमवाजमवीच्याच मंडळीने विर्लो मातुश्री सभागारात प्रयोग



आपल्या व्यक्तीमत्वान बोलणारी मोना वॉशबोर्न

असे रेखीव आणि एकदिलाने केले की वाटावे, वर्षानुवर्षे एका कंपनीत राहून जणू सर्वांमध्ये एक उत्तम परस्पर-समजूत निर्माण झाली आहे. मी मनाशी म्हणालो, जमवाजमवीने जर एवढे उत्तम प्रयोग होऊ शकणार असतील तर नटांना पगारी ठेवणाऱ्या कंपन्याच कशाला हव्यात ? संयुक्त नटसंघदेखील चालतील. फक्त नटांनी जबाबदारीने अंगच्या कलेशी आणि हातच्या नाटकाशी शंभर टक्के इमान राखले पाहिजे.

या मंडळीने केलेले ' मिस्‌अलायन्स ' हे शॉ-लिखित नाटकच घ्या. या नावाचा अर्थ ( नाटकांच्या नावांचे अर्थ आगाऊ विचारण्याची आपली पद्धत आहे म्हणून ) दर्जाला न शोभेशी सोयरीक. आता याने या नाटकातल्या मुख्य प्रसंगाचाच झाल्यास बोध होऊ शकेल. नाटकातला बोध अनेक परींचा आणि तो जागोजाग विखुरलेला

विजय तेंडुलकर

आहे. एकत्रितपणे तो सांगता येणार नाही आणि तशी जरुरीही हे नाटक लिहिणाऱ्या बर्नार्ड शॉसाहेबाला वाटली नसावी. कारण एका वेळी अनेक गंगाजमनी गोष्टी त्याने रंगमंचावर मांडल्या आहेत आणि शिवाय रंगमंचावर उच्चारल्या जाणाऱ्या संवादांतून इतर अनंत परस्पर-असंबद्ध गोष्टींवर त्याने त्याच्या बोचऱ्या, खवचट शैलीने शेरे मारले आहेत ते वेगळे. या नाटकाचा काळ या शतकाच्या आरंभीचा. स्थळ—तत्कालीन एका गबर मध्यमवर्गीय 'यशस्वी' व्यापाऱ्याचे घर. हा व्यापारी अंडरवेअर्स म्हणजे स्त्रीपुरुषांची 'आतील' वस्त्रे तयार करून विकणारा. म्हणजे तत्कालीन उच्चवर्गीय घरंदाज 'नैतिक' दृष्टिकोनातून विचार करता काहीतरी अनुल्लेखनीय लज्जास्पद असे विकून जगणारा. त्याला स्वत:लाच याची जाणीव; तरीही आपण उच्चवर्गीय संस्कृतीत जमा व्हावे ही हौस. म्हणून तो शक्य तितका उच्चवर्गीयांसारखा जगतो आणि तत्त्वचिंतन वगैरे नाद जोपासतो. आपली बायको, तरुण पोर, तरुण मुलगा उच्चवर्गीय मुलांप्रमाणे व्हावीत असा त्याचा आग्रह असतो. ही मंडळीही तसे प्रयत्न करतात पण मूळ खोडी काही जात नाहीतच. उच्चवर्गीय आहारविहारातून या पांढरपेशा मध्यमवर्गीय प्रवृत्ती डोकावत राहतात. शॉच्या विनोदाने हे खाद्य हेरून भरपूर वापरले आहे.

बंडखोर शॉच्या या नाटकाचे कथानक विचारू नका. ते नाहीच. दोन अंकांत अंडरवेअर्स-निर्मात्याच्या तरुण कन्येच्या वाङ्निश्चयाच्या एका सलग घटनेचा तात्पुरता शेवट कुठेतरी होतो, इतकेच. तिसरा अंक यानंतर येता तरी नवल नव्हते. आणि तो आला नाही म्हणूनही काही बिघडलेसे वाटले नाही. ज्या नाटकाला घटनांची एखादी परिपूर्ण, तर्कशुद्ध मांडणी किंवा साधे पात्रांच्या जा-येचे सहेतुकपणदेखील अभिप्रेत नाही त्याचा शेवट अमुकच पद्धतीने व्हावा असे कसे म्हणता येईल ? साधारणत: कंटाळा येणार नाही तोवर ते संपावे असे आपण म्हणू; आणि तसे हे नाटक संपलेही.

तत्कालीन समाजजीवनाची काही चुरचुरीत, प्रसंगी फार्सिकल विडंबने आणि सातत्याने लाह्यांसारखे फडाफड उडणारे सर्वस्पर्शी चमकदार संवाद एवढेच या नाटकाचे बळ. म्हणजे तंत्रदृष्टया कोणत्याही सर्वार्थाने 'नाटक' ठरणाऱ्या नाटकातले हे निम्मेच बळ; पण या निम्म्या बळाला आपल्या मार्मिक समजुतीची व चटपटीत अभिनयगुणांची जोड देऊन प्रॉस्पेक्ट प्रॉडक्शन्सच्या कंत्राटी मंडळीने एक कसदार नाट्यानुभव आम्हांला घडवला.

एक तर त्यांनी प्रयोगाचा – विशेषत: या नाटकाचे प्रधान बळ अशा संवादोच्चारणाचा—वेग जलद राखला. याने नाटक रेंगाळले नाही. जलद संवादोच्चारणातही सुस्पष्टता सहसा हरवली नाही. (दूरध्वनिक्षेपकांशिवाय हे प्रयोग त्यांनी 'बिर्ला मातुश्री सभागारा' सारख्या पसरट नाट्यगृहात केले हे विशेष.) आणि आपापल्या व्यक्ति-विडंबनातले विक्षिप्तपण जो तो आणि जी ती फार सहजपणे आणि लोभसपणे

सांभाळीत होती. उतार वयाचा अंडरवेअर्स निर्माता मिस्टर टार्लटन यांना सुबत्तेने झालेला अनेक प्रकारचा म्हातारचळ, त्यांच्या ह्यायपाशिया या चमत्कारिक नावाच्या कन्येच्या कानी घरच्या सुबत्तेमुळेच विशेषत्वाने शिरलेले यौवनाचे आणि अनिर्बंधतेचे वेडे वारे, त्यांच्या पत्नीची, मिसेस टार्लटन हिची, उच्चवर्गीय पुरंध्री होण्याची चाललेली घडपड, कन्येचे होतकरू वर म्हणून घरात येणारी उच्चवर्गीय 'सुसंस्कारसंपन्न' तरुण पोरे, घरात शिरलेली एक पोलिश 'फिअरलेस' नादिया लिना झेपानोवस्का, एक 'सोशालिस्ट' पिस्तौलवाला ( काडतुसांशिवाय ) इत्यादी विडंबने, या नटमंडळीने साजेशा बालिश अफलातूनपणे आमच्यासमोर उभी केली. इंग्लंडमधला विसाव्या शतकाचा आरंभ-काळ, त्यातली मूल्ये, त्यातला 'उच्च' होऊ पाहणारा मध्यमवर्ग, त्यातल्या घराच्या अंगणात येऊन, नासधूस करीत उतरणाऱ्या विमानांसारख्या आणि बिनगोळ्यांचे पिस्तूल घेऊन घरात घुसणाऱ्या मुकेकंगाल 'समाजवाद्यां'सारख्या गमती जमती, या नव्या नवलाईच्या गोष्टींविषयीचे मोठ्यामोठ्यांचे बालिश कौतुक, हे सर्व या संचाने चांगले पेलले, आमच्यापर्यंत पोचवले. पण हे सर्व प्रथमदर्शनीच आम्हांला जाणवून देणारे नेपथ्य आटोपशीर तरीही तत्कालीन श्रीमंत घराची उत्तम कल्पना देणारे होते. या नेपथ्याचा वापरही दिग्दर्शक डोनाल्ड होवार्थ यांनी बराच कौशल्याने केला. अत्यंत अर्थपूर्ण आणि प्रधान महत्त्वाचा असा 'शब्द' निष्प्रभ होईल असे काहीही तांत्रिक त्यांनी आल्ल्या प्रयोगात चुकूनही केले नाही, ही त्यांची समज आणि हा त्यांचा संयम मराठी रंगभूमीवरच्या बहुसंख्य दिग्दर्शकांना वस्तुपाठ ठरण्याजोगा होता. ( पण यांतले कोणी प्रयोगाला उपस्थित नव्हते. ) हाती एका अर्थी एक एकांगी, सदोष, 'दुबळे' नाटक असताही प्रकाशयोजनेची जादू, 'इफेक्ट्स'च्या क्लृप्त्या नेपथ्यातले चमत्कार, पार्श्वसंगीत किंवा भडक अभिनय यांतले काहीही या दिग्दर्शक महाशयांनी अकारण, केवळ बालबुद्धी प्रेक्षकांवर वजन मारण्यासाठी, अवलंबिले नाही. उलट नाटकाची सामर्थ्ये हेरून ती नेमकी उठावदारपणे रंगमंचावरून प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यावर त्यांनी लक्ष एकवटले आणि त्यात ते यशस्वी वाटले. फारसा टिकाऊ किंवा रेंगाळणारा परिणाम करणारे मूळचे नाटक नव्हते त्याला ते काय करणार ? लक्षात राहिले ते अभिनयाचे पैलू आणि संवादांतले चमकदार सवाल-जबाब. यात क्रमच लावावयाचे तर जॉर्ज बर्नार्ड शॉ ( या नाटकातील सर्वांच्या मुखांतून सतत बोलत राहणारे तैलबुद्धी विनोदवीर, असे अदृश्य परंतु दर क्षणी प्रकर्षाने रंगमंचावर जाणवणारे प्रमुख नटवर्य), मोना वाशबोर्न ( मिसेस टार्लटनच्या विलोभनीय भाबड्या, हृद्य भूमिकेत; ), टिम प्रीस ( मुकेकंगाल 'समाजवादी' गनर), डॅन्व्हर्स वॉकर (अंडरवेअर्सचा घाऊक निर्माता मिस्टर टार्लटन ), अँड्र्यू रे ( उमराव घराण्यातला नबळा दुबळा कुचकामी पोरगा बेंटले ), पेनेलोपे ली ( पोलिश वंशातली तुफान 'फिअरलेस' नादिया,), इंग्रिड हॅफ्नर ( नायिका

हायपाशिया), रॉबिन काल्व्हर ( सुसंस्कारसंपन्न आणि म्हणून प्रेयसीचे चुंबनही घेण्याचे जबाबदारपणे नाकारणारा पर्सिव्हल), असे लागतील.

पैकी मोना वॉशबोर्न या कोण हे इंग्रजी चित्रपटांच्या शौकिनांना सांगितले पाहिजे. ' माय फेअर लेडी ' चित्रपटातली म्हातारी पण एखाद्या छोटया मुलीच्या प्रसन्न चेहऱ्याची वैशिष्टयपूर्ण हाउसकीपर आठवा. बुटक्या, स्थूल बांध्याची पण चटपटीत, लयबद्ध हालचाली आणि मुद्राभिनय करणारी.

याच त्या बाई. आम्ही यांना साक्षात रंगमंचावर पाहिले. इतकेच नव्हे तर पत्रकार मेळाव्यात त्यांच्या शेजारी बसून त्यांच्याशी गप्पादेखील केल्या. मी जन्मलो नव्हतो तेव्हापासून या बाई सतत रंगभूमीवर आहेत. सर लॉरेन्स ऑलिव्हिए या ब्रिटिश नटश्रेष्ठाबरोबर त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर एक प्रमुख भूमिका केली आहे. यांना भारतीय संस्कृतीत फार रस आहे आणि त्यांनी योगाभ्यासदेखील केला आहे. मनात आले की आमच्या एखाद्या मराठी नाटकात यांना एक भूमिका कोणी द्यावी. भाषेचा सवालच नको; केवळ आपल्या व्यक्तिमत्त्वानेच ही आज्जी अडीच तीन तास सहज तुम्हाआम्हांला भूल घालून रंजवील ! नक्की !

काही माणसांचे कंठ बोलतात. काहींचे डोळे बोलतात. पण काही थोडयांची व्यक्तिमत्त्वेच सर्वांगाने सतत काहीतरी बोलत, व्यक्त करीत असतात.

मी तरी उत्तम नट त्यांना मानतो. ¤

राज्य-नाटय-स्पर्धांच्या अंतिम फेरीबाबत एकत्रितपणे नंतरच लिहावे लागेल, कारण अद्याप या फेरीची अठरा डब्यांची आगगाडी दृष्टीपुढून पुरतेपणी सरकून गेलेली नाही. सध्या म्हणजे आजमितीस तिचे चार-सहा डबे बाकीच आहेत. त्यांतले किती फर्स्ट आणि किती थर्ड क्लासचे (क्वचित एखादा मालडब्बादेखील) ते ठरायचे आहे. परीक्षक जबाबदारीने आणि प्रेक्षक उत्सुकतेने रोज रात्री ' रंगभवना 'च्या उघडया पटांगणात गर्दीने जमून थंडीवाऱ्यात या हौशी रंगभूमीच्या धावत्या सरकारी गाडीची शोभा पाहत आहेत एवढे खरे. कित्येकदा रंगमंचावरचे दृश्य निराशाजनक दिसले तरी प्रेक्षागृहातले आशादायक असते. केवळ अगत्य ! केवढा उत्साह ! केवढी चिकाटी ! आणि कधी कधी केवढी सहनशीलतादेखील.

## सती

**समजली**

**जाणवली नाही**

**मुक्काम मुंबई**



। अंजली फडके । दत्ता कळसकर ।

या वेळी, या फेरीत झालेल्या एका वेधक नाट्यप्रयोगावर जरा विस्ताराने लिहिणार आहे. हा प्रोग्रसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनचा होता. ही संस्था महाराष्ट्रातील हौशी रंगभूमीवर मातबर म्हणून मान्यता पावलेली. या फेरीत व्यंकटेश माडगुळकरांचे 'सती' नावाचे नाटक हिने सादर केले. या नाटकाने थंडीवाऱ्यातील अक्षरशः 'नाट्य' प्रेमी सर्वसामान्य प्रेक्षकांच्या सहनशीलतेची काही वेळा कसोटी पाहिली.

'सती'चा आधार श्रीमती कमलाबाई देशपांडे यांच्या एका स्त्रीजीवनविषयक ग्रंथातील एक सत्य ऐतिहासिक प्रसंग हा होता. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी एका मराठा घराण्यात हा प्रसंग घडला होता. या घराण्यातील सुनने, ज्याच्याशी तिचा विवाह झाला होता त्याच्या मृत्यूनंतर त्याच्यासाठी सती जाण्याचे नाकारले आणि पुढे एका इंग्रज अधिकाऱ्यासाठी ती सती गेली, असा थोडक्यात हा प्रसंग. व्यंकटेश माडगुळकरांनी यातले या स्त्रीशी निगडीत असलेले भावनिक नाट्य हेरले. आणि मराठा घराण्यातील ती सून ब्राह्मण घराण्यात आणण्यापुरताच एक ठळक बदल मूळ घटनेत करून ही घटना जवळ जवळ मूळ स्वरूपात नाटकात मांडण्याचा प्रयत्न केला.

घराणे बदलण्याची आवश्यकता माडगुळकरांना का भासली असावी त्याचे एक उत्तर असे असू शकेल की, याने या घटनेतील आशयाला अधिक धार येणार होती. मराठा घराण्यातील कुळाभिमान प्रखर; पण तत्कालीन ब्राह्मणाच्या धर्माचरणाचा

गवगवा त्याहून मोठा होता. अशा घराण्यात हा प्रसंग घडावा हे मूलतःच अधिक धक्का देणारे ठरण्याजोगे होते. परंतु याहूनही एक वेगळे कारण या बदलाला असू शकत होते. ते असे की, सतीची चाल मुळात क्षत्रियांची; ती ब्राह्मणांनी– अर्थात पुरुषवर्गानेच–आपल्यामागे आपल्या बायका कुणाला लाभण्याचा संभव उरू नये आणि आपल्या कुटुंबीय स्त्रियांनी पतीमागे जिवंत उरून अनाचाराचा संभव शिल्लक ठेवू नये म्हणून आपल्या लढाऊ काळात आपल्या जमातीत रूढ केली. विशुद्ध धर्माचरणाला विरोध आणि जे आचरण धर्माने मुळात आपल्याला बंधनकारक मानलेच नाही पण अन्यायाने व आग्रहाने आपल्यावर लादले जाते त्याला विरोध, यांतील दुसऱ्या प्रकारचा विरोध अधिक लोकमान्य ठरण्याचा संभव होता. प्रेक्षक या विरोधाला अधिक सहानुभूती दाखवतील अशी शक्यता होती. माडगूळकरांनी कदाचित हाही हिशेब केला असावा. कारण ' सती 'ची नायिका प्रारंभी सती जाण्याला विरोध करताना प्रेक्षकांची सहानुभूती संपादन न करती तर नंतर एका इंग्रजासाठी ती सती जाण्याचे ठरवते त्या जागी प्रेक्षक तिच्याविषयी निश्चितच एक अढी निर्माण करून घेते.

काही असले तरी हा एवढा एक, नायिकेच्या जातीचा बदल सोडल्यास, मुळात काय कसकसे घडले असेल याचा प्रांजळ शोध घेतच माडगूळकरांनी या नाटकाची कथावस्तू घडवलेली दिसली. अगदी नायिका लक्ष्मी हिच्या लग्नापासून त्यांनी कथानकाला आरंभ केला आणि लक्ष्मी इंग्रजासाठी सती जाण्याचे ठरवते, येथवर हे कथानक पोचवले. या कथानकातील घटनांना एकांकी एकप्रवेशी सुटसुटीत रचना देण्याचाही हट्ट त्यांनी केला नाही. सरळ प्रवेशांमागून प्रवेश लिहिले. मूळच्या घटनांचा संथ आणि काहीसा अपेक्षित उलगडा करीत नेला. यात पदरचा मीठमसाला केवळ झणझणीतपणासाठी टाकण्याचा मुळीही प्रयत्न त्यांनी केला नाही. कमीत कमी संवाद लिहिले. लिहिले तेही शक्य तितके सरळ साधे लिहिले. ना कुठे विनोदासाठी की ना कुठे अश्रूंसाठी शब्दांचे सायास. याने 'सती' हे लिखित नाटक अन्य मराठी नाटकांहून फार संथ, फार साधे, फार कमी शब्दांचे आणि फिके उतरले. काही जागी तर ते सैलही राहिले.

अशा या अपरिहार्यपणे फिक्या, सैल, संथ नाटकाचा प्रयोग करणे सोपे नव्हते. (यावर, हे आहे अशा स्थितीत, चित्रपट काढणे सोपे आहे–असे माझ्या पुढेच बसलेले एक चित्रपट-दिग्दर्शक म्हणाले. चित्रपट अर्थात मराठी नव्हे, इंग्लिश– हा त्यांचाच लगोलगचा शेरा!) दिग्दर्शक मालवा केळकर यांनी हे आव्हान पत्करले हेच फार केले. आपल्यापरी त्यांनी भरपूर कष्टही घेतले. मुंबईत स्पर्धेच्या फडात दिसला तो ' सती ' चा प्रयोग पुष्कळच शिस्तीत झाला. पण तो मूळ नाटकाला न्याय देणारा मात्र वाटला नाही–खरे म्हणजे मूळच्या नाटकावर अन्याय करणाराच वाटला.

लिखित नाटकात सातत्याने नाटकाचा विषय नायिका लक्ष्मी हिच्या भावविश्वाभोवतीच विणलेला होता. प्रथम सती जाण्याला विरोध आणि नंतर आत्मार्पणभावनेने सती जाणे, या दोन टोकांमधला या स्त्रीचा भावनिक प्रवास हा लिखित नाटकाचा विषय होता. प्रयोगात या विषयावरचे प्रेक्षकांचे लक्ष ढळावे असेच फार काही करण्यात आले होते. उदाहरणार्थ नेपथ्य आणि प्रकाशयोजना. नेपथ्य आपल्या रंगांनी एक भव्य, नयनरम्य झगझगीत भास निर्माण करीत होते आणि भरपूर प्रकाश एखादे रूढ पद्धतीचे सरधोपट नाटक सुचवीत होता. प्रकाशातले प्रासंगिक बदलदेखील नाटकाच्या केंद्रीभूत विषयापेक्षा तात्पुरत्या नाट्याविष्कारासाठीच घडत असावेत असे वाटत होते. तेच पार्श्वसंगीताचे. वस्तुत: काळा आणि पांढरा या दोन मूळ रंगांतच या नाट्यवस्तूला नेपथ्याचे बळ लाभू शकत होते. प्रकाशयोजना मंद आणि प्रसंगी काळोख्या भागांचा भरपूर उपयोग करणारी आवश्यक होती. पार्श्वसंगीतात भावनिक पीळ व्यक्त होण जरूर होते. प्रत्यक्ष प्रयोग या तिन्ही अंगांनी सुसह्य आणि बह्वंशी डोळे बांधून ठेवणारा झाला, परंतु डोळ्यांपलीकडे आणि कानांपलीकडे अधिक आत–खोल तो पोचला नाही. वस्तुत: लिखित नाटकाच्या विषयात, प्रवेशात ही ताकद होती. तिला अनुकूल दृश्य स्वरूप लाभते तर ती जाणवल्याविना राहिली नसती. परंतु लाभलेले दृश्य स्वरूप अनुकूल नव्हते. इतकेच नव्हे तर प्रतिकूल ठरले.


नेपथ्य, प्रकाशयोजना यांप्रमाणेच पात्रांचे रंगमंचावरील नियंत्रणही लिखित नाटकाला अनेकदा हानिकारक ठरत होते. नायिकेच्या आंतरिक मनोव्यापाराभोवती नाटकाचा विषय सातत्याने एकवटला असताही प्रत्यक्ष रंगमंचावर नायिकेबरोबरीने इतर दुय्यम–तिय्यम पात्रे महत्त्व पावत होती. दिग्दर्शन प्रत्येकाला सारखेच प्राधान्य देताना दिसत होते. काही प्रसंगी तर नायिकेहूनही अधिक वाव एखाद्या नैमित्तिक आणि नाटकात केवळ साधनभूत अशा पात्राला मिळाला. स्वत: दिग्दर्शक मालबा केळकर यांनी केलेल्या भूमिकेचेच उदाहरण इथे देता येईल. हा वृद्ध यात्रेकरू रंगमंचाच्या मध्यभागीच मध्यवर्ती खांबाशी येऊन झगझगीत प्रकाशाचा झोत अंगावर घेत सुखेनैव मांडा घालून बसला. नायिका डाव्या कोपऱ्यात अंधारात गेली. हा यात्रेकरू सांगत होता त्या हकीकतीतले शब्द अर्थ घेणार होते ते नायिकेवरील त्यांच्या परिणामाने. परंतु नायिकेचा मुद्राभिनय तिच्यावरील मंद प्रकाशात दिसू शकत नव्हता. याउलट बारीक सारीक 'जागा' आणि त्यावरील 'दाद' मजेमजेने घेत एखादे कथाकथन करावे तशी यात्रेची आपली एरवी बिनमहत्त्वाची परंतु नायिकेच्या दृष्टीने फार महत्त्वाची हकीकत यात्रेकरू महाराजांनी आपल्या मध्यवर्ती, सुप्रकाशित उच्चासनावरून सर्वांना सावंत ऐकवली आणि कृतार्थ होत्साते ते प्रयाण करते झाले. येथवर महत्त्व आले ते त्या स्वतंत्रपणे निरर्थक हकीकतीला; आणि नायिकेवरील त्या हकीकतीचा परिणाम–म्हणजे त्या सर्व हकीकतींचे उद्दिष्टच–

राहिले रंगमंचाच्या कोपऱ्यात, अपुऱ्या प्रकाशात कुचंबून. स्वत: दिग्दर्शकानच आपल्या तिय्यम भूमिकेत सर्व महत्त्व आपल्याकडे घेण्याचा मोह टाळला नाही, मग त्याने दिग्दर्शित केलेल्या अन्य भूमिकांचे वेगळे काय होणार ? नायिकेचे चुलत सासरे, सासू, घरातल्या दोन सोवळ्या विधवा, वडील, तिसऱ्या अंकातील मराठा स्त्री यांना असे अनावश्यक प्राधान्य वारंवार मिळत राहिल्याने नायिकेचा आधीच फिक्या शैलीत लिहिलेला भावनिक प्रवास आणखीच फिक्कट झाला आणि या नाटकाला मुळात गृहीतच नसलेले अनेकपात्री संविधानक नाही, हे प्रकर्षाने प्रेक्षकांना जाणवून देण्यात आले. अव्वल नाटचवस्तूचा केवळ बाह्य सांगाडा प्रेक्षागृहात पोचू शकला; आणि प्राण नायिकेच्या भूमिकेतील अंजली फडके यांच्यापाशीच घोटाळत राहिला. समजणाऱ्यांनी तो समजून घेतला, बाकींनी निर्मितिमूल्यांची वाहव्वा करीत ' पण हे सर्व कशासाठी ? नाटच कुठे आहे ?' असा जुनाच सवाल नव्याने उपस्थित केला. नाटच होते; फार मातबर होते; परंतु फिक्या, पाचपेच नसलेल्या सरळमार्गी लेखनशैलीत ते पुरतेपणी सापडले नाही; आणि तरीही जे सापडले ते तसे हलकेसलके नव्हते, परंतु सरधोपट तपशीलवार वास्तववादी दिग्दर्शनाच्या वजनदार साच्यात ते गुदमरून पडले. अधिक प्रतिभाशाली दिग्दर्शनाने ' सती 'चे सोने होऊ शकले असते, असे मानण्याला भरपूर जागा आहे.


अभिनयात अंजली फडके (लक्ष्मी) भूमिकेच्या ताकदीच्या मानाने कमी वाटल्या. त्यांच्या कामात मन:पूर्वकता होती परंतु अवघ्या व्यक्तिमत्त्वाने एखादी भूमिका विकसित करीत जाण्याचे अत्यावश्यक सामर्थ्य जाणवले नाही. दिग्दर्शनानेही त्यांच्या भूमिकेवर अन्याय केला. राम खरे इंग्रज कॅप्टन म्हणून शोभले. अभिनयातली त्यांची शिस्त या भूमिकेचा रांगडा तरीही उमदा स्वभाव प्रस्थापित करताना फार उपयोगी आली. दत्ता कळसकर, जयंत धर्माधिकारी, सेवा चौहान, इत्यादी सराईत नटसंचाने आपापल्या भूमिकांचा आब चांगल्या प्रकारे राखला. एकूण प्रयोगच शिस्तबद्ध सुसूत्रपणे झाला.

याहून अधिक काही त्यात असणे आवश्यक व शक्यही होते ते मिळाले नाही ही मोठी रुखरुख. ' सती ' समजली पण जाणवली नाही.

O



कुलकर्णी दाम्पत्य सुखी आहे. त्यांच्या विवाहाला तीन वर्षे झाली. त्यांना अजून मूलबाळ कसे नाही यामागील त्यांची भूमिका समजावून घेण्यासारखी आहे. मुलांच्या बरोबर जबाबदारी येते. त्यांच्या संगोपनासाठी काळजी, कष्ट, वेळ व पैसाही आवश्यक असतो. मुलांच्या शिक्षणाची व इतर गोष्टींची संपूर्ण तरतूद करता न आल्यास नुसती मुले होऊन काय उपयोग? शिवाय वैवाहिक सुखाचा काळ काय पुन्हा येत असतो? म्हणून पहिले अपत्य जरा उशीराच होऊ देण्याचे त्यांनी ठरविले आहे. आपण सुखी असल्याचे ते सांगतात ते यामुळेच.



*कुलकर्णी दाम्पत्य सुखी आहे—*

**तसेच तुम्हीही?**



67/186

# कलावंत !



मध्यरात्र उलटून गली होती शुक्रवार· तीन जून. वटपौर्णिमेचा दिवस. पौर्णिमेचा चंद्र आकाशाच्या मध्यावर सरकला होता. चारी बाजूंना चांदीचा रस ओतावा असा शुभ्र चंदेरी प्रकाश विखुरला होता. विश्वनाथ मंदिराच्या मागल्या बाजूनं बोळकांडीतून बाहेर पडलं की दुकानांची रांगच रांग दिसते. लाकडी खेळण्यांनी, पितळेच्या मूर्तींनी, ताम्हन-तबकांनी ही ओळ भरगच्च भर-लेली असते. लहान लहान गल्लीबोळांतून अडीअडचणींतून भाविक मंडळी दाटी-वाटीनं, श्रद्धनं मार्ग कापीत असतात. तिथंच फुलवाले हार, पुडचा, पूजेचं सामान मांडून बसतात. तिथंच गटा-राच्या पाण्यालगत विटांवर बूड टेकून भिकारीही हात पसरून बसलेले दिसतात. बोळातून बाहेर पडलं की अश्वमेध घाटा-कडं जाणारा मुख्य रस्ता लागतो. विश्व-नाथाच्या बोळाच्या बाहेरल्या तोंडाशी कोपऱ्यावर मिठाईचं दुकान आहे. त्याच्यालगत बनारसी पानवालासुद्धा. या मिठाईच्या दुकानातला कळकटलेल चिरगुटांतला उघडा पंडित गंध लावून बसलेला असतो. तोंडात पानाचा तोबरा. भोळचा भाविकांना देवापुढं ठेवायचा प्रसाद तो बांधून देतो तसाच शौकिनांना भांगेचे प्यालेही भरून देतो. वाराणसीचं हे दृश्य जितकं गलिच्छ तितकंच श्रद्धेनं ओथंबलेलं. त्या अरुंद बोळातून वाहणारं पाणी, घोघावणाऱ्या माश्या, विडचाचे थुंकलेले पिक, कुजलेलं निर्माल्य हे पाहून जसं अंग शहारतं तसंच नवस बोलणारे, फेडणारे,

- - - - - - - - -

## सौ. चंद्रप्रभा जोगळेकर

- - - - - - - - -

डोळयांत आसवं आणून देवाजवळ गाऱ्हाणं सांगणारे भक्त पाहिले की अतीव करुणा उत्पन्न झाल्यावाचून राहत नाही. दिवसा हा बोळ गजबजलेला असतो. आता मध्यरात्रीच्या सुमारास वाराणसी जागी होती ती फक्त बाजारपेठेतून पलीकडे खोलात असलेल्या वारांगना राहत तिथंच. विश्वनाथाच्या बोळात नीरव शांतता होती. अश्वमेध घाटावरच्या तंबूत लोक आडवेतिडवे पसरले होते. होडया बांधलेल्या होत्या आणि पाण्याच्या पृष्ठभागावर डोलत होत्या. गंगामाई मल्याबुऱ्यांनी तिच्या पात्रात धुऊन टाकलेलं पाप आपल्या पोटात सामावून संथपणे चंद्रप्रकाशात न्हाऊन घेत होती.

रस्त्यावर गस्त घालणारा गुरखा काठी आपटीत, शिट्टया वाजवीत हिंडत होता. विश्वनाथाच्या बोळाशी एकदम धावपळ झाली.

" पकडो ऽ पकडो साले को ऽ" असे आवाज निघाले तेव्हा गुरख्यानं कर्कश शिट्टया मारल्या, कोपऱ्यावर दुकानाच्या फळीवर टेकलेला रात्रपाळीवाला पोलीसही घाईनं आला. हातातला टॉर्च त्यानं सावरला. आणि जिथून आवाज आले तिथं पोचला. मिठाईवाल्याच्या बाकडयाच्या आडोशाला लपलेल्या व्यक्तीच्या ओढाताणीची कल्पना येताच त्यानं विजेरीचा प्रकाशझोत त्याच्यावर टाकला. उजवा हात डोळयावर आडवा झाकीत त्या माणसानं मान खाली घातली.

" कौन है भाई, क्या हुवा ?" करीत त्यानं जमलेल्या दोघाचौघांना प्रश्न विचारला.

" हा माणूस एकदम बोळात शिरला. कोण आहे म्हणून विचारल्यावर दचकला, घाबरला अन् धावत धावत तक्तपोशीच्या खाली लपला. पकडो इसको--"

" पण हा आहे कोण ?" पोलीसदादानं चौकशी केली.

" क्या पता ? चोर असणार ?"

एव्हाना गुरख्यानं त्याचा दंड धरून त्याला बाहेर ओढून काढलं होतं, पोलिसाकडे पाहून तो किंचित हसला, हात जोडीत म्हणाला --

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**माझं पोट शांत झालं होतं. आग विझली होती. माझी कला जागृत होत होती. मी चित्रं रेखली – सूर्योदय, सूर्यास्त, कोमल चेहरे, विरहिणी, आणि बाबांनी माझा कान धरला—**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

" साहेब तुमच्या विजेरीचा झोत माझ्या तोंडावर टाकू नका. "

" अरे, ये तो संन्यासी है !"

" अजी साहब क्या संन्यासी, क्या साधू, आजकल इन्हीं लोक ये काम करते हैं. साधू संन्यासी कोई सच्चा नहीं. "

त्या माणसानं आपल्या भगव्या कपडयांवर हातानं झटकल्यासारखं केलं, पोलिसाकडे एकटक पाहत तो पुन्हा हसला आणि अजीजीनं म्हणाला—

" होय साहेब. मी संन्यासी आहे. पण साहेब मी चोर नाही. "

" एवढ्या रात्री इथं काय करतो आहेस ?

" बाबूजी प्रथम ती विजरी दूर ठेवा. मला कल्पनातीत संकोच वाटतो. होय. मी एक संन्यासी आहे. साहेब तुमच्या डोळ्यांतलं आश्चर्य, विस्मय समजला मला. तुमच्या डोळ्यांत एक प्रकारची चमक आहे. हां हां, कृपा करा विजेरी उचलू नका. सांगतो—सांगतो साहेब, मी एक संन्यासी आहे. "

" ते कळलं. पुढं बोल. पोलीस ठाण्यावर चल. "

" नको नको साहेब. माझं ऐकून घ्या. माझ्या अंगावर भगवी वस्त्रं आहेत, माझं मुंडन केलेलं आहे. मी बुद्ध अनुयायी आहे. "

" भगवी वस्त्रं घातली अन् मुंडन केलं म्हणजे भागत नसतं. आजकाल जटा वाढवून दाढीमिश्या राखून अंगाला भस्म फासून नकली साधू नीचातला नीच व्यवहार करतात. सोनं विकतात, दारू विकतात, पोरीबाळी फसवून नेतात, त्यांना कुमार्गाला लावतात. चल आटप, चौकीवर चल. तुझं नाटक आमच्या डोळ्यांत धूळ फेकू शकणार नाही. पण—पण—तुझा चेहरा निष्पाप दिसतो, तुझे डोळे गहिरे दिसतात, तसा तू बदमाष वाटत नाहीस. " पोलीस त्याच्या डोळ्याशी करडी नजर भिडवीत म्हणाला.

" नाही ना दिसत ? मी बदमाष नाही साहेब. खरंच नाही. मी एक चित्रकार आहे. "

" चित्रकार ?"

" होय साहेब. नाही विश्वास बसत ?"

" पण तू इथं आलासच कसा, कुठून ?"

" सांगतो, सांगतो. जरा तिकडं चलता मोकळ्यावर साहेब ?"

पोलीस घट्ट उभा होता. आजूबाजूची जमलेली माणसं म्हणाली—

" साब, ये भाग जायेगा, पकड लो इसको. "

" नाही साहेब. मी पळून नाही जाणार. मला फक्त बोलू द्या. सांगू द्या. " हात जोडून सर्वांकडं केविलवाणी नजर टाकीत तो म्हणाला.

" मग बोल ना लौकर. काय उगीच वेळ घालवतो आहेस ? तुझे आणखी साथीदार आहेत की काय ?"

" नाही—नाही साहेब. मी एकटा आहे. साहेब, मी सारनाथच्या आश्रमातून पळून आलो आहे. मी एक चित्रकार आहे. नाही खरं वाटत ?"

" तू सारनाथहून पळून आलास ? तुझ्या डोळ्यांतली चमक कलावंताची दिसते खरी. तुझ्या चेहऱ्यावर वेगळंच तेज आहे. पण तू इथं कशाला आलास ? काय करतो आहेस ? तू जवान दिसतो आहेस. संन्यासी कसा काय झालास ?"

" सांगतो. तेच सांगतो साहेब. मी कोण, कुठला मला माहीत नाही. लहानपणी मी ज्यांच्या आसऱ्याला होतो ती माणसं अगदी हलक्या जातीची होती. अस्पृश्य होती. तेव्हाही मी असाच पळून आलो होतो. "

" पळून आला होतास ? कुठून ?"

" अनाथाश्रमातून. तिथं मला कोणी, कुठून आणून ठेवलं मला माहीत नाही. पण मला तिथं राहावंसं वाटलं नाही. मी तिथून पळून गेलो. दिल्लीच्या भिकार-वाड्यात एका पोरट्याच्या नादी लागून मी वास्तव्याला गेलो. तो म्हणाला होता—

" तुला काम मिळवून देतो. नोकरी मिळवून देतो. पण साहेब, मला काम मिळालं नाही, नोकरी मिळाली नाही. चुकूनसुद्धा कोणी रोटीचा तुकडा अंगावर फेकला नाही. ती अस्पृश्यांची वस्ती. मी ज्यांच्या आसऱ्याला होतो, ती माणसं म्हणत, हातात झाडू घे, पायखाने साफ कर, तुला पैसा मिळेल. पण साहेब, मी तसलं काम अनाथाश्रमात कधी केलं नव्हतं. माझे हात धजले नाहीत. माझ्या सवंगड्यानं एका घरात मला बळेच नेलं. तिथला तो भंगी. त्याच्याबरोबर मी घरात घुसलो. ते घर एका कर्मठ मद्राश्याचं होतं. साहेब, सकाळची वेळ होती. इडलीदोशाचा नास्ता चालू होता. खमंग वास माझ्यापर्यंत लोळत आला होता. किती तरी दिवसांचा मी उपाशी. मी उगीच आत डोकावलो. म्हातारी बोडकी बाई माझ्यावर खेकसली. भिंतीला हात टेकून मी उभा राहिलो. तिनं नुसतं आकांडतांडव केलं. तिला वाटलं, मी अस्पृश्य. भराभरा भांड्यानं तिनं वऱ्हांड्यात पाणी ओतलं. पुन्हा आत पाऊल ठेवू नकोस म्हणून बजावलं. टेबलावरच्या केळीच्या पानावर वाढलेल्या पदार्थांना माझी नजर लागली म्हणून त्या वृद्धेनं ते गुंडाळून केराच्या डब्यात अर्ध-उष्टावलेलं फेकून दिलं. मी उचलून खाल्लं, साहेब. असंच उष्टंमाष्टं मी खात होतो. भूकेनं व्याकुळ होत होतो. हुश्श ! उफ् ! ते दिवस आठवले की अद्याप अंगावर काटा उभा राहतो साहेब."

" तू जातीनं अस्पृश्य आहेस ?"

" मला माहीत नाही साहेब. मी कोणाच्या पोटी जन्म घेतला, केव्हा, कुठं—सारं अज्ञात आहे. पण मी दिल्लीला राहत होतो तो महारवाड्यात एवढं खरं. काश्मीरी गेटच्या पलीकडं जुग्या होत्या त्या. "

" तू संन्यासी कसा झालास ? काय म्हणून ? जीवनाला विटलास ?"

" नाही साहेब. जीवनाला कंटाळलो नाही, विटलो नाही. पण ऐका ना साहेब.

महारवाड्यात मी गल्लीतल्या कुत्र्यासारखा हिंडत होतो. येता जाता हाडहाड होत होती. काम हवं तर झाडू हाती घे, म्हणून मला सर्वजण म्हणत होती. पण तेवढं माझ्याच्यानं होत नव्हतं. काम करायचं नाही तर भीक मागून खा म्हणून ते मला हाकलून देत. लक्ष्मीनारायण मंदिराच्या पायथ्याशी एकदा मी जाऊन बसलो. पण साहेब, भीक मागायला माझा हात धजला नाही. मी एक चित्रकार आहे. ते महारवाड्याचं, भिकाऱ्यांचं दृश्य इतकं आत्मसात करायला मला रुचलं नाही. माझं मन बंड करीत राहिलं. फाके पडत होते. पोटात भुकेचा डोंब उसळत होता. अंगावर लक्तरं लोंबत होती. ऐन उन्हाळ्यात डांबरी सडकेवर माझे अनवाणी पाय जळत होते. लांब चालत जायचं, अखेरचा दम निघेपर्यंत चालायचं म्हणून मी चालत गेलो. लाल किल्ल्याच्या मागल्या बाजूला रिंगरोडवर मी स्वतःला फरफटत गेलो. साहेब, त्याच रस्त्यावर राजघाट आहे. गांधींची समाधी. तिथल्या हिरवळीवर, झाडांच्या सावलीत बसायला म्हणून गेलो. तिथं मी नेहमी जात असे साहेब. तिथं गेलं की माझ्या मनाला मोठा दिलासा मिळे. मोठं, शांत, पवित्र वातावरण ! मी कोण मला माहीत नाही. पण मी महारवाड्यात वावरलो, म्हणून अस्पृश्य बनलो होतो. आम्हा दलितांचा, धिक्कारलेल्यांचा आधार, विसावा अशा त्या महापुरुषाची, महात्म्याची समाधी. तिथं गेलं की माझं मन शांत शांत होई. असं वाटे, हा महात्मा आता असता तर मी त्याच्या पायांवर लोळण घेतली असती, भुकेनं व्याकुळलेलं शरीर त्यांच्या चरणांवर वाहून टाकलं असतं, त्यांचा परोपकारी, मायेनं भरलेला एकच शब्द, एकच स्पर्श मला तहानभूक विसरायला लावू शकला असता. त्यांनी माझा उद्धार केला असता. मला फक्त माझं अस्तित्व ज्ञात होतं. मला आपलं म्हणायला कुणी नव्हतं. पण अनाथांचा तो वाली मला माझा वाटला असता. माझ्या मायबापांची जागा त्यानं घेतली असती. पण ते नाहीत. पण त्यांची समाधी आहे ना साहेब ? आहे. दिल्लीच्या पोटात ते पवित्र स्थान आहे. साहेब, मी जरा जास्त विस्तारानं बोलतोय नाही ? पण माझं मन उघडायला मला कधी संधीच नाही मिळाली. "

" तू मूळ मुद्द्यावर ये कसा ? तुझी कहाणी पुन्हा केव्हा तरी ऐकू सवडीनं. "

" तर काय झालं साहेब, मी राजघाटाकडे गेलो. भुकेनं मी कळवळलो होतो, उन्हानं होरपळलो होतो. तडक मी आत जाऊन समाधीच्या कट्ट्यावर डोकं आपटलं. रडलो, खूप रडलो. कळवळलो. कोणाच्या तरी स्पर्शानं मी दचकलो. वर मान करून बघितलं. भगव्या वस्त्रांतली चारपाच माणसं उभी होती. गांधीजींनी माझा आक्रोश ऐकला होता. मी अन्नासाठी टाहो फोडत होतो. गांधीजींनी या माणसांच्या रूपानं मला अन्नाचा घास घाडला होता. त्यांनी मला थोपटलं. मी कोण, कुठला, कुठून आलो, विचारलं. पण मी काय सांगणार ? मी महारवाड्यातून आलो म्हणून सांगितलं. हातात झाडू घेणं मला जमत नाही म्हणून सांगितलं. मी रडलो. फार रडलो. त्यांनी मला सांगाती आपल्या मठात नेलं. पोटभर खाऊ घातलं आणि मग

वाराणसीस मी त्यांच्याच बरोबर आलो. सारनाथच्या आश्रमात त्यांनी मला भरती केलं. तिथल्या मुख्य बाबांनी मला विचारलं –

" ह्या आश्रमाच्या सावलीत राहायला तुझी तयारी आहे ?" मी का नाही म्हणणार होतो ? मला पोटाला अन्न मिळणार होतं. मला अंग झाकायला कपडा मिळणार होता. उन्हापावसांपासून संरक्षणाला आश्रय मिळणार होता. उपासमारीची व्यथा मोठी असह्य होती साहेब ! त्या रोटीच्या तुकड्यासाठी मी दीनवाणा झालो होतो."

" तुला संन्यास घ्यावा लागेल." बाबा म्हणाले,

" घेईन. संन्यास घेईन." मी म्हटलं.

" संन्यास म्हणजे काय ?" " ऐहिक सुखाची विरक्ती. गृहस्थाश्रम पूर्णपणे विसरायला हवा. भगवान बुद्धाच्या पायाशी सर्वस्व वाहायला हवं. कबूल आहे ?"

" कबूल आहे." मी उत्तरलो. आणि मग माझं मुंडन करण्यात आलं. माझ्या डोक्यावरची दाट झुलपं इतस्ततः विखुरली. डोक्याची आग आग होईस्तवर वस्तरा फिरला. अर्धनग्न शरीरावर भगव्या वस्त्रांचा साज चढला. असा मी संन्यासी झालो, साहेब. साहेब, मी एक चित्रकार आहे, कलाकार आहे."

" पण तू इथं कशाला आलास ? का आलास ?"

" सांगतो ना साहेब, सगळं सांगतो. तुमचे पाय दुखले असतील ताटकळून. म्हणूनच म्हणत होतो पलीकडं बसू या."

मिठाईवाल्यानं एक बाकडं बाहेर आणून टाकलं. एक मोडकी खुर्ची. मंडळी त्यावर टेकली. गुरख्यानं टोपी काढली अन् रस्त्यावरच उकिडवा बसला. पोलिसानं बिडी शिलगावली. हलवायानं पोलिसाच्या बिडीवर टेकवून आपली बिडी पेटवली. गुरख्यानं डोळे मिचकावीत संन्याशाला बंडल दाखवलं. हात जोडीत संन्यासी म्हणाला

" नको, मला नको. मी ऐहिक गोष्टींचा त्याग केला आहे. मी संन्यासी आहे. बुद्ध धर्माचा अनुयायी आहे."

" संन्यासीबाबा, आपली कहाणी आटपा लौकर, उशीर होतोय." बिडीचा झुरका मारीत पोलीस बोलला.

" माफ करा साहेब. लौकर आटपतो. सांगतो. साहेब मी चित्रकार आहे. आश्रमात मी बाबांना सांगितलं. तेव्हा मला कुंचला मिळाला. रंग मिळाले. अन् मी चित्रं रेखली. माझं पोट शांत झालं होतं. आग विझली होती. माझी कला जागृत होत होती. मी चित्रं रेखली–सूर्योदयाची, सूर्यास्ताची, फुलांच्या ताटव्यांची, सुंदर कोमल चेहऱ्याच्या बायकांची, भरदार वक्षस्थळांची, नागिणीसारख्या नागमोडी केशसंभाराची, प्रियाराधनाची, विरहिणींची, मीलनोत्सुक युवतींची. आणि बाबांनी माझा कान धरला. मी संन्यासी आहे, मला गृहस्थाश्रम विसरायचा आहे, ऐहिक सुख विसरायचं आहे, प्रेमपाश, शरीरसुख यांची कल्पनादेखील त्या चार भिंतींच्या आत येता कामा नय, त्याची पुसट छायासुद्धा माझ्या मनावर पडू नये अशी मला ताकीद

देण्यात आली. माझ्यात कला आहे तर त्या कलेचा आविष्कार मी फक्त संत महंतांची चित्रं रंगवण्यात, भगवान बुद्धाची रंगीत पवित्र रेखाचित्रं आकारण्यातच व्हायला हवा अशी माझी समजूत घालण्यात आली. मी तेही केलं साहेब. भगवान बुद्धाची अनेक चित्रं रंगवली. बाबांचं मोठं थोरलं व्यक्तिचित्र रेखाटलं, स्वर्गातली मनोरम चित्रं काढली, नरकाची क्रूर शिक्षा कशी दिली जाते त्याची हिडिस चित्रं काढली. माझ्या कुंचल्याला याशिवाय अधिक काही रंगवायची मुभा नव्हती. तरुणींचे गुबगुबीत गाल, आतुर डोळे, भरदार शरीर त्या कुंचल्याला रंगवायला मुभा नव्हती. माझी कला फक्त एकाच मार्गानं जायची होती. साहेब. तुम्ही माझ्याकडं एकटक पाहत आहात. तुम्हांला माझा अद्याप संशय येतोय? माझ्या रटाळ कहाणीला कंटाळलात ? "

" माझ्या प्रश्नाचं उत्तर तू जाणूनबुजून टाळतो आहेस. तू संन्यासी का झालास, कसा झालास ते कळलं. पण तू इथं कसा आलास, अपरात्री कुठं गेला होतास, काय करीत होतास, कोण आहे म्हणून विचारल्यावर का घाबरलास, का पळालास ते सांग–" हलवाई अधीरतेनं म्हणाला—

" हां बाबूजी सांगतो. "

" लौकर सांग. सारी रात्र उलटून जाईल. पहाटेसच पुन्हा कामाला जुंपायचं आहे आम्हांला ! "

" सांगतो. एकाच धर्तीची चित्रं रंगवून माझा कुंचला बोथटला साहेब, माझं मन उडालं त्यातून. मला कंटाळा आला. साहेब मी नास्तिक मुळीच नाही. देव मीही मानतो. पण त्याच परमेश्वरानं जगात सौन्दर्य निर्माण केलंय. फुलांचे नाजूक रंग, तारुण्याचा उन्माद, प्रेमाची ओढ, तृप्तीची आसक्ती निर्माण केली आहे. जग सुंदर आहे. जीवन क्षणभगुंर आहे. मला कबूल आहे. पण या थोडक्यातच माणसाला त्या सौन्दर्याचा आस्वाद घ्यायचा आहे. साहेब, मी तरुण आहे. माझी जन्मतारीख कोणालाच ठाऊक नाही. पण अंदाजे माझं वय पंचविशीच्या वर नसावं. मी तरुण आहे. तारुण्याची ओघवती लहर माझ्या शरीरातून कैकदा फिरली आहे. बाहेरच्या जगात वावरण्याची मनस्वी ओढ मला लागली आहे. बुद्धाच्या मंदिरात दर्शनाला आलेल्या युवतींवर माझी नजर कितीतरी वेळा घोटाळली आहे. मोकळ्या हवेत मनमुराद हसण्यासाठी माझा जीव कितीदा आसुसला आहे. गजबजाटात, धावपळीत विसंबून जाण्याची ओढ माझ्या मनानं अनेकदा अनुभवली आहे. सुंदर स्त्रीच्या स्पर्शाची आसक्ती मला वरचेवर बेचैन करून गली आहे. मी संन्यासी आहे. मला तो अधिकार नाही. पण माझं मन निरासक्त, अलिप्त नाही. मला समजलं तुमच्या चेहऱ्यावरचं नवल–विस्मय कळला मला. तुम्हांला वाटतंय बाजारपेठेतून पलीकडच्या माडीवर जीव शांत करायला मी आलोय की काय अशी तुमची समजूत आहे, पण नाही साहेब. खोटं कशाला सांगू ? अद्याप मी बिडीला शिवलो नाही, भांग-दारू

चाखली नाही, स्त्रीचा स्पर्श अनुभवला नाही. महारवाड्यातल्या बायाबापड्या पाठीवर थाप मारीत तेवढंच. शृंगाराच्या, प्रेमाच्या आसक्तीपोटी, विकार-वासनेपोटी होणारा स्पर्श मी अद्याप अनुभवला नाही."

"बाबा, तू इथे काय करीत होतास ते थोडक्यात कृपा करून सांगशील काय ? फटफटायला आलंय."

"सारनाथला एकदा हिरवळीवर बसून मी चित्रं रंगवीत होतो. सहज एकटाच बाहेर सटकलो होतो. कोपऱ्यात एक जोडपं बसलं होतं. अगदी अजाणत्या माझं मन त्या स्त्रीच्या मुखावर लोभावलं. एका कागदावर मी तिचा चेहरा भराभर रेखून घेतला. त्यात रंग भरल्यावर तो फारच सुंदर झाला असता. माझ्या पाठीशी कोणी उभं होतं. माझं रेखाचित्र पुरं होतं ना होतं तोच त्या माणसानं माझं लक्ष वेधून घेतलं. मी शरमलो. फार शरमिंधा झालो. एका संन्याशानं स्त्रीचं चित्र रंगवावं हे योग्य नव्हतं. संकोचून मी त्याला माझी सारी हकिगत सांगितली. तो स्वतःही एक कलाकार आहे. उत्तम चित्रकार आहे. त्याच्या कलेला बंधन नाही. आणि म्हणूनच की काय त्याच्या कुंचल्याला उदात्ताची ओढ आहे. सारनाथच्या वेगवेगळ्या मंदिरांतून त्यानं तऱ्हेतऱ्हेची चित्रं रेखाटली आहेत. आमची दोस्ती झाली. तो मला बरेचदा भेटला साहेब. तो इथं गावात राहतो. पलीकडे माडीवर त्याच्याकडे चित्र-रेखाटनासाठी मॉडेल्स येतात. एखादं चित्रं मी काढून द्यावं असं त्यानं म्हटलं होतं. दुपारचाच मी आश्रमातून पळून आलो होतो. त्याच्या खोलीत बसून अतिशय उत्तम चित्र मी रंगवलंय साहेब. मी पत्ता देतो. तुम्ही सकाळी पाहून या. अन् माझ्या कलाकृतीचा हा एक नमुना बघा." कफनीखाली काखेत गुंडाळून ठेवलेला कागद त्यानं बाहेर काढला. एक सुंदर नग्नचित्र पाहून सर्वांचे डोळे चमकले.

"साहेब लाजेची–शरमेची गोष्ट म्हणजे माझ्या संन्याशाच्या वस्त्रांत–वेषात मी तुमच्या हाती सापडलो. मित्राच्या घरून निघून मी स्टेशनची वाट धरीत होतो. कुठं तरी लांब जायचंय मला. ही वस्त्रं फेडून टाकायचीत मला. माणूस म्हणून जगायचंय साहेब. मी तिथून निघालो. आणि तुमच्या हाती सापडलो. या संन्याशाच्या वस्त्रांत. हे बरं नाही झालं साहेब. कृपा करून मला जाऊ द्या. मी चोर नाही. मी अपकृत्य केलं नाही. मी माणूस आहे. मी एक चित्रकार आहे. माफ करा साहेब. तुमचा फार वेळ घेतला. जाऊ द्या मला आता. कृपा करा. विजेरीचा झोत टाकून मला माझ्या भगव्या कपड्यांत लाजवू नका. मी जातो." क्षणार्धात तो उठला. झपाझप पावलं टाकीत त्याची तेजःपुंज मूर्ती दृष्टीआड झाली. पोलीस मनाशीच म्हणाला——

"मी माणूस आहे, मी चित्रकार आहे, मी कलाकार आहे." त्यानं रंगवलेलं नग्नचित्र पोलिसाच्या हातातच होतं. त्या रंगामध्ये तो राजबिंडा चेहरा सामावलेला होता. त्या माणसाचा, चित्रकाराचा, कलावंताचा ! ○

[ Robert Browning यांच्या 'Fra lippo Lippi' या कवितेवर आधारित ]



डॉ. ब्रोनोवॅस्की म्हणजे एक महाकलंदर असामी ! मानवी जीवनाचा शोध घेण्यासाठी कोलंबसाच्या जिद्दीने हा महाविलक्षण माणूस जन्मभर हिंडतो आहे. ब्रोनोवॅस्कीच्या आयुष्याची सुरुवात झाली ती गणितज्ञ म्हणून. वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची गणितातील डॉक्टरेट संपादन केली. नंतर मात्र ब्रोनोवॅस्की गणित सोडून साहित्यक्षेत्रात उतरले. त्यांनी खूप कविता

दत्तप्रसाद दाभोळकर

# कोलंबसाची मुलाखत

लिहिल्या. एकवेळ उदयोन्मुख कवी म्हणून स्टिफन स्पेंडर, विल्यम एम्पसन यांच्याबरोबर त्यांचे नाव गाजत होते. मात्र साहित्यक्षेत्रात त्यांचा खरा बोलबाला झाला तो विल्यम ब्लेकवरील 'मॅन विदाउट मास्क' या त्यांच्या पुस्तकामुळे.

ब्रोनोवॅस्की साहित्यक्षेत्रात असे रमलेले असतानाच दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी ब्रोनोवॅस्की संख्याशास्त्राच्या व्यावहारिक उपयोगाकडे वळले.

दुसऱ्या महायुद्धांत ब्रिटिश बाँबफेकी विमानांनी बर्लिनवर केलेल्या अचूक बाँबवर्षावाचे श्रेय ब्रोनोवॅस्की व त्यांच्या सहकार्यांनी केलेल्या मार्गदर्शनाकडे जाते. महायुद्ध संपल्यावर अणुयुद्धाची महाभयानकता सांगणारी टेलिव्हिजनवरची त्यांची भाषणे खूप गाजली.–आणि मग ब्रोनोवॅस्की टेलिव्हिजनच्या क्षेत्रातच उतरले. जवळ जवळ एक तप त्यांनी या क्षेत्रात काम केले. अनेक श्रुतिका लिहिल्या आणि बसविल्या. त्यांच्या 'फेस ऑफ व्हॉयलन्स' या श्रुतिकेला तर ब्रिटनमधील सर्वोत्कृष्ट श्रुतिका म्हणून 'इटालिया प्राइज' मिळालें.

आज मात्र ब्रोनोवॅस्की जीवनशास्त्राच्या अभ्यासात रंगलेले आहेत. जीवनशास्त्राच्या अभ्यासासाठी जगप्रसिद्ध असलेल्या सॅक इन्स्टिटयूटचे ते उपसंचालक आहेत.

सदैव आपल्याच तंद्रीत असलेला आणि विलक्षण भेदक डोळ्यांचा हा माणूस नुकताच मुंबईत आला होता. 'सायन्स टूडे' च्या 'सी. आर.' यांनी त्या वेळी घेतलेल्या त्यांच्या मुलाखतीतील हा महत्त्वाचा भाग.

**प्रश्न**– लिओनार्डो डी व्हिन्सीनंतर विद्वान आणि कला यांचा समन्वय घालण्याचा प्रयत्न तुमच्याइतक्या प्रभावीपणे कोणीच केलेला नसावा. हा समन्वय घालणे तुम्हांला कसे शक्य झाले ?

– लिओनार्डो डी व्हिन्सीबरोबर माझी तुलना करावयाचा मोह क्षणभर बाजूला ठेवू. खरा प्रश्न जरा वेगळाच आहे. साऱ्याच शास्त्रज्ञांनी लिओनार्डो डी व्हिन्सीप्रमाणे मानवी जीवन यथार्थपणे समजावून घेणे अगत्याचे आहे. –आणि आजच्या जगात कलाकारापेक्षा शास्त्रज्ञाला ते अधिक सोपे आहे.

**प्रश्न**– आपले हे म्हणणे थोडे अधिक स्पष्ट कराल काय ?

– आता जरा माझेच उदाहरण घ्या. माझ्या नशिबाने शाळेत असतानाच विज्ञान शिकण्याची संधी मला मिळाली. विज्ञान शिकण्याची संधी म्हणजे विज्ञानाची भाषा शिकण्याची संधी. ही भाषा एकदा आत्मसात केल्यावर तुम्ही आजन्म विज्ञानातील नव्या नव्या कलाकृतींचा आस्वाद घेऊ शकता. आता ही विज्ञानाची भाषा शिकलेला माणूस हवे तेव्हा शेक्सपिअर व रवींद्रनाथ यांच्या कलाकृतींचा आस्वाद घेऊ शकतोच. कारण ही कुवत सर्वसामान्यपणे उपजतच असते. पण याच्या उलट प्रकार मात्र बहुधा घडत नाही. कारण विज्ञानाची भाषा ही खास परिश्रम घेऊन शिकण्याचीच गोष्ट आहे. कधी नव्हे इतकी प्रत्येकाने विज्ञानाची भाषा आत्मसात करणे आज अगत्याचे आहे.

**प्रश्न**– सर्वसामान्य जनतेत विज्ञानाबाबत गोडी निर्माण करण्याचा सोपा मार्ग कोणता ?

– तुमचा प्रश्न वरवर वाटतो तेवढा सोपा नाही. प्रत्येक देशात हे मार्ग वेगळे असतील. त्या त्या देशातील लोकांना सध्या काय माहीत आहे त्यावरच हे मार्ग ठरवावे लागतील. आता भारताच्या संदर्भात विचारत असाल तर येथील परिस्थितीची मला फारशी कल्पना नाही. पण भारतात गणित आणि तत्त्वज्ञान यांच्या संदर्भातच प्राणिशास्त्र आणि रसायनशास्त्र शिकवावे लागेल. कारण गणित आणि तत्त्वज्ञान इथल्या भूमीत खोलवर जलेले आहे आणि लोकांना परिचित असलेल्या गोष्टीच्या संदर्भात नव्या गोष्टी सुलभपणे कळतात.

आणि हे करताना शास्त्रीय सत्यांचे मुखवटे बदलण्याचे काहीच कारण नाही. कारण ‘ सत्य गोष्टी ’ या नेहेमीच साध्या, सोप्या आणि सुटसुटीत असतात. कारण नसताना तुम्ही त्यांचा बाऊ करीत आहात.

नोबेल परितोषिक मिळविणारा माझा सहकारी फ्रँक क्रिक याच्याकडे एकदा एक तरुण माणूस आला होता. त्याने क्रिकला मज्जासंस्थेबाबतचे स्वतःचे अनेक नवे विचार ऐकवले. तो तरुण पुढे म्हणाला, “ क्रिक साहेब, माझे म्हणणे मी गणिताने सिद्ध करू शकेन. ” क्रिक त्याच्या या विधानावर फक्त हसला, तो म्हणाला, “ तू गणिताने जे सिद्ध करणार आहेस ते तुला शब्दांतही मांडता आले पाहिजे नाहीतर तुलाच ते नीटपणे आकलन झालेले नाही असे मी समजेन.” –शब्दांचा गोंधळ हा बहुधा विचारांतील गोंधळाचाच निदर्शक असतो.

**प्रश्न**– आपण एकवेळ गणितज्ञ होतात. आज तुम्ही जीवशास्त्राकडे वळला आहात. आपण शोधात तरी कशाच्या आहात ? एका फार वेगळ्या आणि वरच्या पातळीवर जाऊन हे विश्वाचे कोडे उलगडण्याचा तर तुमचा प्रयत्न नाही ना ?

– बरा प्रश्न विचारलात. माणूस म्हणजे एक असामान्य अद्वितीय असा प्राणी आहे. लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीच्या काळात मानवाने खूप काही कमावले आहे.

पण मानवाने हे सर्व कशाच्या जोरावर कमावले ? त्याला मिळालेली कल्पनाशक्तीची देणगी ही त्याला मिळालेली सर्वांत मोठी देणगी आहे. स्वत:चे भावविश्व तो निर्माण करतो व ते तो जगतो त्या भावविश्वाला तो मूर्त स्वरूपही देऊ शकतो. जगात इतर कोणत्याही सजीवाला ही देणगी मिळालेली नाही.

तुम्ही बुद्धिबळ खेळत आहात अशी कल्पना करा. तीस खेळींत तुम्ही डाव हरलात. खरे बघता तीस खेळींत तुम्ही हा डाव हरलेला नसता. त्यांतील प्रत्येक खेळीपूर्वी तुमच्या मनात तुम्ही दहा पंधरा डाव खेळलेले असता. थोडक्यात म्हणजे जवळजवळ तीनशे–चारशे खेळींनंतर तुम्ही हा डाव हरलेला असता.

माझेच उदाहरण घ्या. आज सकाळी माझे विमान चुकले तेव्हा मी थोडा वेळ गोंधळलो. त्यानंतर यामुळे कितीजणांची गैरसोय होईल ते मला आठवले. त्यांच्यापाशी दिलगिरी कशी व्यक्त करावयाची हे मला ठरवावे लागले. आणि हे ठरवत असतानाच शक्य तितका चांगला असा नवा कार्यक्रम मला आखावा लागला.

**प्रश्न**– केवळ कल्पनाशक्तीच्या जोरावरच मानवाला निसर्गातील रहस्ये समजावून घेणे शक्य आहे का ?

– छट् - मुळीच नाही. तुमच्या कल्पनेला व्यवहारात किती किंमत आहे हाच खरा प्रश्न आहे. मूलभूत विज्ञान म्हणजे केवळ स्वप्नाळूपणा नव्हे. समजा एखादा चित्रकार जर उद्या सांगू लागला– माझ्या डोळ्यासमोर एक महान चित्र तरळते आहे. पण मी ते कागदावर काढू शकत नाही तर तो चित्रकार, चित्रकार या संज्ञेस पात्र होणार नाही.

– कल्पना म्हणजे सत्यसृष्टीची तुमच्या मनातील प्रतिमा. शेक्सपिअरचे ऑथेल्लो आणि कालिदासचे शाकुंतल अजूनही लोकांना का आवडते ? – त्यांनी कल्पनेने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा तुमच्या जीवनात तुम्हांला आढळतात हेच त्यामागचे खरे कारण आहे. शास्त्रज्ञाने निर्माण केलेल्या कल्पनेला निसर्गात जर काही स्थान असेल तरच तो शास्त्रज्ञ मोठा ठरेल.

**प्रश्न**– अज्ञाताचा शोध घेणारी, अमूर्ताला मूर्त स्वरूप देणारी अशी ही कल्पनाशक्ती आपणाला अभिप्रेत आहे. भारतातील तत्त्वज्ञ तर फार प्राचीन काळापासून हेच सांगत आले आहेत...

–आपले म्हणणे अगदी बरोबर आहे. मानसशास्त्राचा अभ्यास या भूमीत फार चांगल्या प्रकारे झालेला आहे–पण तरीही एक फरक उरतोच. आम्हांला आज प्राण्यांना काय माहीत नाही हे तर माहीत आहेच. पण आम्हांला आज आणखीही एक गोष्ट माहीत आहे. प्राण्यांना ती कल्पनाशक्ती का नाही याचे कारणही आम्हांला आज माहीत आहे. गेल्या पन्नास वर्षांत जीवशास्त्रज्ञांनी केलेल्या प्रयोगांमुळेच हे शक्य झाले.

एका जीवशास्त्रज्ञाने केलेला एक मजेशीर प्रयोगच मी तुम्हांला सांगतो. एका

खोलीत निरनिराळच्या ठिकाणी त्याने पावाचे चार तुकडे ठेवले. एका कुत्र्याला त्याने ते सर्व तुकडे दाखवून नंतर एका तुकड्याजवळ त्याला सोडून दिले. कुत्र्याने प्रथम तो तुकडा संपवला, पण नंतर तो भांबावला. साऱ्या खोलीत तो इतस्ततः भटकत राहिला. इतर तुकड त्याला मिळतील तसे त्याने संपवले. पण हे तुकडे कोठे ठेवले आहेत हे त्याच्या स्मरणात नव्हते.

त्या शास्त्रज्ञाने हाच प्रयोग नंतर एका वानरावर केला. ते वानर जराही भांबावले नाही. एकामागोमाग एक असा तो त्या चार तुकड्यांजवळ गेला—माकडाला मिळालेली ही स्मरणशक्तीची देणगी म्हणजे मानवाला आज मिळालेल्या कल्पनाशक्तीची सुरुवात आहे. कोणत्यातरी प्रतिमांच्या साहाय्यान भोवतालचे जग तुम्ही आपल्या मनात बंदिस्त करून ठेवता. आणि आपल्या मनातील प्रतिमांची नीट आखणी करतानाच बाहेरच्या जगाची पण तुम्ही सुसूत्र आखणी करून जाता.

—आणि मी तुम्हाला सांगत होतो त्या प्रयोगाचा पुढील भाग तर याहूनही मजेशीर आहे. कुत्र्याला नसलेली ही स्मरणशक्ती माकडाला का मिळाली हे पण शास्त्रज्ञांनी आज शोधून काढले आहे. कुत्र्याच्या मेंदूत नसलेला असा 'फ्रॉंटल लॉब्स (Frontal lobes) हा एकच भाग माकडाच्या मेंदूत आहे. तो छोटासा भाग जर शस्त्रक्रिया करून तुम्ही काढून टाकलात तर माकडाची स्मरणशक्ती नाहीशी होईल. ते पेटीवर चढू शकेल. उड्या मारू शकेल. नाना प्रकारच्या क्रीडा करू शकेल. पण ते कोणतीही गोष्ट स्मरणात ठेवू शकणार नाही. पुढील काही वर्षांत या प्रयोगातून आश्चर्यकारक अशी अनुमाने आपण काढू शकू.

**प्रश्न** – मानवप्राण्याच्या आजवरच्या वाटचालीतील त्याची सर्वांत मोठी कमाई कोणती ?

—कीटचे 'सत्य म्हणजे सौंदर्य व सौन्दर्य म्हणजे सत्य' हे विधान आणि आइनस्टाइनचे $e = mc^2$ हे समीकरण ही मानवाची सर्वांत मोठी कमाई आहे.

**प्रश्न** – भारत आज औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. आणि औद्योगिक क्रांतीच्या मागोमाग भौतिक सुख आलीच. आमची प्राचीन संस्कृती तर भौतिक सुखांच्या विरुद्ध आहे. नवे विज्ञानयुग आणि आमची प्राचीन संस्कृती यांचा समन्वय कसा घालता येईल ?

—मला भारतात आलेले दोन अनुभव सांगतो. तुमच्या प्रश्नाचे त्यामुळे निराकरण होईल. काल मी 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' मधे गेलो होतो. या संशोधन मंदिराच्या बाहेर रम्य वनश्री पसरलेली आहे. इथे ही वनश्री लावण्याचे काम खुद्द भाभांनी केलेले आहे. आमच्या देशातही संशोधनमंदिरांच्या बाहेर अशी वनश्री असतेच. पण आमच्याकडे ती वनश्री लावण्याचे काम शास्त्रज्ञ करीत नाही. दुसरा कोणीतरी ते काम करतो—भारतात हे काम एका शास्त्रज्ञाने केले—विज्ञान आणि सौन्दर्य यांचा समन्वय घालणारे डॉ. भाभा केवढे मोठे असतील.

नुकताच मी अजंठावेरुळला जाऊन आलो. अजंठा आणि वेरुळची लेणी उभारणारी माणसे तरी डॉ. भाभांपेक्षा वेगळी कोठे होती ! सौन्दर्य आणि उपयुक्तता इथे हातात हात घालून उभी आहेत–आणि अजंठा आणि वेरुळ हीच तुमची प्राचीन परंपरा आहे.

**प्रश्न** – आज विज्ञान विनाशासाठीच का वापरले जाते आहे. कोणत्याच शास्त्राला युद्ध नको आहे आणि तरीही आज जग युद्धाच्याच छायेत वावरत आहे ...

–आपण सारेजणच आज एका झपाटलेल्या जगात वावरत आहोत. पण जगाच्या डोक्यावर ही टांगती तलवार धरणारे लोक काही शास्त्रज्ञ नाहीत. माओ काय, जॉन्सन काय किंवा रशियातील राज्यकर्ते काय यांपैकी कोणीही शास्त्रज्ञ नाही.


आणि खरे सांगू. शास्त्रज्ञांनी या जगावर राज्य करावे, त्यांनी या जगाचे नियंते व्हावे ही कल्पनाच मला कशीशी वाटते. शास्त्रज्ञांना ते जमणार नाही. परंतु विज्ञानाचे सर्वरक्षक आणि सर्वभक्षक स्वरूप राज्यकर्त्यांना समजावून देण्याचे काम मात्र शास्त्रज्ञांनी केलेच पाहिजे. आजचे बहुतेक राज्यकर्ते हे आगपेटीशी खेळणाऱ्या अजाण मुलासारखे भासतात. त्यांच्या कल्पनेपेक्षा अणुशक्ती अनेक पटींनी महाभयानक आहे.

शास्त्रज्ञांवर म्हणूनच आज फार मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी राज्यकर्त्यांना काय करा हे सांगण्याची नाही.–पण राज्यकर्ते काय करताहेत हे कोणीतरी त्यांना समजावून द्यावयास हवेच ! पंचेचाळीस सालचीच गोष्ट घ्या. अणुबॉंब बनणार हे अनेक शास्त्रज्ञांना कळून चुकले होते. झिलार्ड आणि इतर अनेकांनी अध्यक्षांना पत्रे लिहिले, "महाशय, आपण काय करता आहात हे आपणाला समजलेले नाही"–आणि झिलार्डचे हे शब्द अक्षरशः खरे होते.

–विज्ञानाचे सर्वरक्षक आणि सर्वभक्षक स्वरूप हे सर्वसामान्य जनतेला आणि राज्यकर्त्यांना समजावून देणे हेच शास्त्रज्ञ आणि कलावंत यांच्यापुढील प्रमुख काम आहे. ○

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

–संपादक



# पुस्तके

सांगलीचे चिरंजीव मासिक प्रकाशन यांनी काढलेला, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील – गौरवांक, हा एक विलक्षण अंक आहे. एका कार्यकर्त्यावर काढलेला असा हा पहिलाच अंक असावा.

एकूण दीडशेएक लोकांनी या गौरवात भाग घेतला आहे. ना. यशवंतराव चव्हाण यांच्यापासून तो साखर-कारखान्यातील कामगारांपर्यंत, अनेकांचे यात लेख आहेत. आपले मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणतात– "एका सामान्य कुटुंबात जन्म पावलेला व सामान्य शिक्षण प्राप्त केलेला कार्यकर्ता आपल्या कर्तृत्वाने व चिकाटीने किती मोठे कार्य करू शकतो याचे श्री. वसंतरावदादा पाटील हे मूर्तिमंत उदाहरण आहे."

## वसंतरावदादा पाटील गौरवांक

नामदार नरेंद्र तिडके लिहितात,– "नेहमी शांत, संयमी आणि हसतमुख असणाऱ्या वसंतरावांनी शासन आणि जनता यांच्यामधील दुवा जोडून अत्यंत कुशलतेने जनतेचे प्रश्न सोडवले." प्रा. म. अ. कुलकर्णी वसंतराव दादांचा स्वभाव सांगताना सांगतात– "दादा फार थोडे बोलतील, बोलतील ते नेमके अचूक. विरोध करतील तोही बिनतोड." श्री. म. ब. भिडे इंजिनिअर म्हणतात– "दादांचा स्वभाव अगर गुणधर्मच असा आहे की अवघड परिस्थितीला आत्मविश्वासानं व निश्चयपूर्वक सामोरे जाऊन मुकाबला करणं."

दि. बा. मोकाशी

वसंतरावदादांच्या स्वभावाबद्दल असे अनेकांनी लिहिले आहे. तसेच त्यांच्या 'सहकारी' कार्याबद्दल अनेकांनी गौरव केला आहे. म. मा. भोसले लिहितात– "त्या (वसंतराव दादांच्या) हातांत सहकाराचा महासागर निर्माण करण्याची क्रिया आहे." वसंतरावदादांनी सांगलीला उभारलेल्या सहकारी साखर कारखान्याबद्दल ते म्हणतात–

"हा कारखाना निघण्यापूर्वी स्वराज्य लाभूनही शेतकऱ्याला त्याचे फळ कसले— साधे पानही लाभले नव्हते. पूर्वापारपद्धतीने तो धान्याची पोती अन् शेंगाच्या टरफलाची दोन पोती पिकवून कसातरी कालक्रमणा करीत होता. पण दादांचा हा कारखाना उभा राहताच त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. आमच्या परिसरातील सामान्य शेतकरीही एस. टी. च्या तिकिटासाठी खिशातून शंभराची नोट काढतो. हे दृश्य पाहिले की मोठी धन्यता वाटते."

सहकारी उद्योग उभे करण्यासाठी दादांनी अनेकांची मने जुळवून, दिवस-रात्र कष्ट घेऊन केलेल्या कार्याचे कौतुक सर्वच लेखकांनी केले आहे. डॉ. सरोजिनीबाई बाबर म्हणतात– "दादांच्या पाठीशी एक प्रचंड शक्ती आमजनतेनं उभी केली आहे. त्यामुळे सहकारी पद्धतीनं उभ्या केलेल्या वीस साखर कारखान्यांचे अध्यक्षपद भुषवून शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करण्यात दादांना विशेष आनंद वाटतो आहे. तीस कोटींच्या वर भांडवल गुंतवलेल्या या साखर कारखान्यांचे काम सुरळीतपणे चालवून महाराष्ट्रभर उद्योगधंद्यांचे जाळे निर्माण करणे हे दादांचे ध्येय आहे. त्यांच्या दृष्टीनं हेच त्यांचं काम, काँग्रेसचे हेच खरे काम आहे."

या सर्व लेखांत नरूभाऊ लिमये यांचा लेख सर्व लेखांत चांगली विचक्षणा करून लिहिलेला असा आहे. वसंतरावदादांच्यासारखा माणूस कसा निर्माण होतो हे सांगताना त्यांनी काँग्रेसवर विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या आक्षेपांना दिलेली उत्तरे अभ्यसनीय आहेत. दादांवरही विरोधकांकडून होणारे आरोप त्यांनी स्पष्ट दिले आहेत व त्या आरोपांचे खंडनही स्वतःच्या दृष्टिकोनांतून केले आहेत.

अपरिचितांना पद्मभूषण वसंतरावदादा पाटील यांच्या विलक्षण कर्तृत्व शक्तीची या गौरवलेखांवरून सहज प्रचिती यावी. महाराष्ट्रात इतरत्र सहकारी सोसायटयांची भयाण दैन्यावस्था असता अशी कोणती जादू वसंतरावदादांनी केली, की त्यामुळे सहकार तागून–भरभराटून त्याला ही सोन्याची फळे आली व सांगलीचा भूभाग ओळखता न येण्याजोगा बदलला याचा अभ्यास इतरत्र झाला पाहिजे.

तसेच आज साखरेचे भाव चढून जनता हैराण झाली आहे. इकडे पद्मभूषण वसंतरावांसारख्या कार्यकर्त्यांनी लक्ष देणे जरूर आहे. सहकारी सोसायटयांनी केलेली निर्मिती सहकारी तत्त्वावर असते. तसेच त्या निर्मितीचा विक्रयही तसाच असावा हे जाणून सहकार्य आपल्या सोसायटयांपुरते मर्यादित न ठेवता इतर सर्व जनतेपर्यंत त्या सहकार्याचा हात पोचवावा, अशी त्याना विनंती करावीशी वाटते. ◻

**[ चिरंजीव मासिक प्रकाशन : सांगली. ]**

# जालन्याची साहित्यिक जत्रा

स. दि. महाजन

मराठवाडा साहित्य परिषदेचे बारावे अधिवेशन जालना येथे दि. ३०–३१ डिसेंबरला साजरे झाले. या निमित्ताने मराठवाड्यातील व बाहेरील आसपास ४०० साहित्यिक व रसिक एकत्र आले होते. दि. ३० ला ५ वाजता अधिवेशनास सुरुवात झाली. व्यासपीठावर पूर्वसंमेलनाध्यक्ष श्री. न. शे. पोहनेरकर, श्री. वि. अं. कानोले, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. भगवंत देशमुख, श्री. अनंत भालेराव आदी महनीय व्यक्ती विराजमान झाल्या होत्या. प्रारंभी वेदपठण व स्वागतगीतानंतर मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. व्यंकटराव देशपांडे यांनी संमेलनाचे उद्‍घाटन केले. ते म्हणाले, " साहित्यिकांनी समाजातील विघातक व अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करणारे लिखाण लिहावयास हवे. ज्या प्रवृत्तींमुळे या देशात घटनेशी एकनिष्ठ राहून लोकशाहीची अस्मिता टिकेल अशा प्रवृत्ती साहित्यिकांनी निर्माण करावयास हव्यात. सामाजिक जागृती ही आजची आद्य गरज आहे. " त्यांचे उद्‍घाटनाचे व्याख्यान कायद्याच्या भाषेत चपखल बसणारे झाले. स्वागताध्यक्ष श्री. भीमराव देशपांडे यांनी यानंतरच्या आपल्या भाषणात उदयोन्मुख साहित्यिकांची साहित्य परिषदेने उपेक्षा थांबवावी असे प्रतिपादून मराठीचा झेंडा जगात फडकविण्याची अपेक्षा व्यक्त केली. त्यांचं व्याख्यान उत्कृष्ट विधिज्ञाला साजेसे झाले. कल्पना व आलंकारिकता यांची मुक्त पेरणी त्यांच्या व्याख्यानात दिसली. मराठीतील एक थोर विद्वान व व्यासंगी नि तर्ककर्कश टीकाकार श्री. भालचंद्रमहाराज कहाळेकर यांची अध्यक्षपदासाठी सूचना करण्यात आली. मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या वतीने अनुमोदन देण्यात आले. प्रा. कहाळेकर यांनी आपल्या आवेशपूर्ण नि विद्वत्ताप्रचुर भाषणात मराठवाड्यातील वाङमयाचा वेचक आढावा घेऊन निरनिराळ्या क्षेत्रांतील मराठवाडीय साहित्य-

कांचा गौरव केला. आपल्या अपेक्षा मांडताना महाराजांनी मराठीच्या नव्या व संपूर्ण वाङ्मयेतिहासाची आवश्यकता प्रतिपादन केली. याशिवाय साहित्य-शास्त्र आणि समीक्षापद्धतींचा गोंधळ त्यांनी जाणिवेने मांडला. साहित्याच्या सदोष वर्गीकरणाबद्दल त्यांनी टीका केली आणि नवसाहित्यावरील जुने आक्षेप खोडून टाकण्याचा प्रयत्न केला. मराठी शुद्धलेखनाचे सध्याचे नियम सर्वव्यापी व संपूर्ण अव्यंग आहेत असे वाटत नाही हे स्पष्ट केले, आणि मराठी महामंडळाच्याच वतीने या शुद्धलेखनाच्या नियमांत इष्ट ती परिवर्तने घडवून आणावीत असे सांगितले. महाराजांचे भाषण जसे छापले होते, तसेच होते असे नव्हे. ते स्वतः त्यात बरेचसे वेगळे आणि मौलिक विचार सतत पेरीत होते. महाराजांच्या अध्यक्षीय निवडीमुळे संमेलनास मारदस्तता प्राप्त झाली होती.

याच रात्री ' नाटचसुवर्णा, ' मुंबई या व्यावहारिक नाटचसंस्थेने विद्याधर गोखले लिखित ' सुवर्णतुला ' हे नाटक सादर केले. मी स्वतः तरी इतके उत्कृष्ट व अभिनयाने परिपूर्ण असलेले नाटक अद्याप पाहिले नव्हते. प्राधान्याने सुरेश हळदणकर, मा. दामले यांच्या अभिनयास मुळी तोडच नव्हती. नाटचगीतांचे गायन कुणी रेकते आहे की काय अशा पद्धतीचे झाले. या नाटकाच्या मध्यंतरात श्री. विद्याधर गोखले यांचे प्रदीर्घ व्याख्यान झाले आणि वाटले की नाटकापेक्षा व्याख्यानच झाले असते तर उत्तम झाले असते. व्यावहारिक नाटचसंस्थेनेसुद्धा पैसे घेऊन असे प्रयोग सादर करावेत याची खंत वाटली.

दि. ३१ ला सकाळी ' आजचे मराठी वाङमय पुरेसे प्रक्षोभक आहे काय ?' या विषयावर प्रा. कहाळेकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद साजरा झाला. त्यात सर्वश्री दादासाहेब रूपवते, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. वानखेडे, म. भि. चिटणीस, प्रा. नरहर कुरुंदकर, अनंत भालेराव, भगवंत देशमुख व भा. गं. देशपांडे यांनी भाग घेतला होता. या प्रक्षोभक परिसंवादातून काय निष्पन्न झाले हे उमजले नाही, मात्र आजचे मराठी वाङमय हे पुरेसे प्रक्षोभक नाही हे सर्वांनी एकमताने मान्य केले. प्रा. कुरुंदकर हे सतत प्रश्न उपस्थित करीत गेल्याने वक्ते गोंधळून जाऊ लागले व या गोंधळातून परिसंवाद किचकट होत गेला. श्रोते सहनशीलता टिकवून मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दुपारी विषयनियामक समितीच्या बैठकीनंतर खुल्या अधिवेशनास प्रारंभ झाला. राजकीय, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रांतील दिवंगतांना श्रद्धांजली, सीमाप्रश्न, मराठीचा शासनातील संपूर्ण वापर, प्रादेशिक भाषेस विद्यापीठीय व्यवहाराची भाषा करणे आदी विषयांवर एकमताने ठराव मंजूर झाले. निरनिराळ्या व्यक्तींनी ठराव मांडताना आपली मते मांडली व ठरावाची पार्श्वभूमी विशद केली. यानंतर मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. नरहर कुरुंदकर यांनी जालनेकरांचे हार्दिक आभार मानले. अध्यक्ष प्रा. कहाळेकर यांनी समारोप अत्यंत उचित असा केला व

साहित्य परिषदेकडून आपल्या विविध अपेक्षा व्यक्त केल्या. स्वतःला गौरवाचे स्थान दिल्याबद्दल मराठवाडा साहित्य परिषद व स्वागत समिती यांचे आणि उत्कृष्ट व्यवस्था ठेविल्याबद्दल जालनेकरांचे आभार मानले.

रात्री झाले कविसंमेलन. अध्यक्षा होत्या सुप्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत. एकूण ४२ कवींनी यात भाग घतला. नारायण सुर्वे, ना. धों. महानोर, राजा मुकुंद, राम शेवाळकर, लक्ष्मीकांत तांबोळी, अरविंद थिटे, प्रा. प्रामाणिक, गजमल माळी या कवींचे काव्यवाचन सुरेख झाले. कवी फार असल्याने व कविसंमेलनात संयोजकता नसल्याने नंतर श्रोते कमी कमी होत गेले. मराठवाड्यात कवींची वाण नाही ही गोष्ट येथे प्राधान्याने जाणवली. दर्जेदार कमी व चिल्लर फार अशी कविसंमेलनाची हालत झाली. सर्वश्री इंदिरा संत, सुर्वे, महानोर यांच्या कवितांनी मात्र श्रोत्यांची मने जिंकली.

जालनेकरांनी संमेलनव्यवस्था अत्यंत चोख ठेवली होती. पाहुण्यांना मोफत जेवण व चहा ही सोय सर्वांनी प्रशंसा करावी इतपत चांगली होती. श्री. शिवाजी गऊळकर, दंड, कामतीकर, रांजणीकर, जाफराबादकर यांनी संमेलनासाठी भरपूर श्रम घेतल्याची जाणीव सतत होत होती. यात एक झाले–काही कवींची पादत्राणे चोरीला गेली ! (याबद्दल वाईट वाटणे नको.)

या संमेलनात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे तरुण साहित्यिकांचे आगमन. तरुणांच्या गटानेच या संमेलनास शोभा आणली होती. अशा रीतीने कायमची आठवणीत राहील अशी ही साहित्यिकांची दोन दिवसांची जत्रा अत्यंत यशस्वी झाली असे म्हणावयास हरकत नाही. ○


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २


लेनिन म्हणाला
क्रांतीची हीच शोकांतिका आहे
की
ती किंचितही विरोध
सहन करू शकत नाही.

हुकुमशाहीच्या अस्तित्वासाठी दहशतवादाचा अवलंब करावा लागतो हे लेनिनचे काही मत नव्हते. क्रांतीपूर्वी कित्येक वर्षे तो आपल्या या मताचे आग्रहाने प्रतिपादन करीत असे.

१९०८ मध्ये जिनिव्हा येथे लेनिनशी या विषयावर आपले बोलणे झाल्याची आठवण त्याचा जुना मित्र ॲंडोराटस्की याने लिहून ठेवली आहे. एकदा अशाच या दोघांच्या क्रांतीसंबंधी गप्पा चालू असताना ॲंडोराटस्की याने लेनिनला विचारले, 'समजा, उद्या रशियात क्रांती होऊन तुझ्यासारखे क्रांतिकारक सत्तेवर आले तर त्यांनी जुन्या नोकरशाहीबद्दल कोणते धोरण स्वीकारावं असं तुझं मत आहे.'

एका क्षणाचाही विचार न करता लेनिन उत्तरला, 'आम्ही प्रत्येक माणसाला विचारू की क्रांतीसंबंधी तुझं कोणतं मत आहे? तू आमच्या बाजूचा आहेस की विरोधी बाजूचा? तो जर आमच्या विरुद्ध असेल तर आम्ही त्याला नष्ट करू. पण तो जर का आमच्या बाजूने काम करावयास तयार झाला तर आम्ही त्याला आमच्यात सामावून घेऊ.'

या वेळी क्रपस्काया तेथे हजर होती. ती म्हणाली,




'म्हणजे याचा अर्थ असा की आपलं प्रामाणिक मत व्यक्त करण्याचं धाडस जे लोक दाखवतील त्यांना तुम्ही ठार करणार, असंच ना?'

'होय,' लेनिन म्हणाला, 'आणि मला त्यात वावगंही काही वाटत नाही.'

बोल्शेव्हिक क्रांती झाल्यानंतरचा असाच एक प्रसंग नमूद करण्याजोगा आहे. जे सैनिक आघाडीवरून पळून येतील त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात येईल असे केरेन्स्कीने जाहीर केले होते. कामेनेव्हच्या सूचनेनुसार बोल्शेव्हिक मंत्रिमंडळाने हा हुकूम रद्द केला. लेनिन या बैठकीला हजर नव्हता. त्याला जेव्हा आपल्या सहकाऱ्यांनी फाशीची शिक्षा रद्द केली असल्याचे कळले तेव्हा तो संतापाने फणफणला, 'हा काय मूर्खपणा आहे! क्रांती टिकवायची असेल तर फाशीची शिक्षा रद्द करून कसं चालेल!'

लेनिनचा काही गैरसमज झालेला आहे असे कामेनेव्हला वाटले. तो म्हणाला, 'आघाडीवरून पळून येणाऱ्या सैनिकांपुरतीच ही सवलत देण्यात आली आहे.'

लेनिन आता तरी शांत होईल अशी कामेनेव्हची

अपेक्षा होती. परंतु लेनिनचा राग शमलेला नव्हता. तो म्हणाला, 'सैनिकांपुरती सवलत देणं हीदेखील चूकच आहे. आपण शांततावादी आहोत असा नसता देखावा करण्याचं काहीही कारण नाही. सैनिकांना खूष करण्यासाठी हे असलं दुबळं धोरण काय कामाचं! तावडतोब ती सवलत रद्द करा पाहू.'

'परंतु आता तसं करण्यानं लष्करात उगाचच असंतोष निर्माण होईल.' कामेनेव्हने शंका व्यक्त केली.

त्यावरही लेनिनचे उत्तर तयार होते. तो म्हणाला, 'ठीक आहे. सवलत रद्द करू नका, पण त्याबरोबरच जे कोणी आघाडीवरून पळून येतील त्यांना फाशी देण्यासही कमी करू नका.'

जे कोणी नव्या राजवटीला विरोध करतील त्यांना जागच्या जागी गोळ्या घालून ठार करण्यात येईल असा जेव्हा लेनिनने हुकूम काढला तेव्हा डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाच्या मंत्र्यांनी दहशतवादाच्या या रौद्र स्वरूपाला आपला तीव्र विरोध असल्याचे लेनिनला सांगितले.

त्यांची समजूत घालण्याकरिता लेनिन म्हणाला, 'क्रांतीची हीच दु:खांतिका असते की ती विरोध सहन करू शकत नाही. अतिशय क्रूर वाटणारी दडपशाही केल्याशिवाय आपण आपली राजवट स्थिर करू शकू का याचा नीट विचार करा म्हणजे मी काय म्हणतो ते पटेल.'

ट्रॉटस्कीने लिहिले आहे–'दहशतवाद अपरिहार्य आहे हे एकच वाक्य या कालखंडात लेनिन दररोज आमच्याकडून पाठ करून घेत होता. तो आम्हांला विचारायचा, 'कुठाय तुमची हुकुमशाही? मला तर ती कुठंच दिसत नाही. जो कोणी आपल्या विरुद्ध कारवाई करतो त्याला जर का आपण ठार मारलं नाही तर मग ही कसली क्रांती?'

नव्या राजवटीविरुद्ध उठाव करण्याचा कोण कोण प्रयत्न करीत आहे याचा एकदा बोल्शेव्हिक नेत्यांनी आढावा घेतला. त्या वेळीदेखील लेनिन असाच संतापला होता. त्याने आपल्या सहकाऱ्यांना विचारले, 'या विरोधकांना मुळासकट नष्ट करून टाकण्यासाठी आपल्या जवळ एखादा लोहपुरुष नाही काय?'

लेनिनला अभिप्रेत असलेल्या लोहपुरुषाचे सारे गुण झेर्झिन्स्कीमध्ये होते. सदैव हसतमुख असलेल्या झेर्झिन्स्कीला क्षणात राक्षसी अवतार धारण करण्याची कला अवगत होती. दुसऱ्याच्या मतासंबंधी त्याला किंचितही पर्वा नव्हती. पक्ष-सहकाऱ्यांबद्दलदेखील त्याला ममत्व वाटत नव्हते. तो एकटचा लेनिनला मानत असे. आपले विरोधक मृत्युदंडालाच पात्र आहेत याविषयी लेनिनप्रमाणेच त्याच्याही मनात संदेह नव्हता.

इतर बोल्शेव्हिक नेत्यांप्रमाणेच झेर्झिन्स्कीही कामगारवर्गातून पुढे आलेला नव्हता. विल्नो प्रांतातल्या एका श्रीमंत शेतकऱ्याचा हा मुलगा. विद्यार्थिदशेतच त्याने लियुआनियानिस्ट सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले आणि यामुळे त्याला हद्दपार व्हावे लागले. पुढे ही स्वारी पोलिश डेमोक्रॅटिक पक्षात शिरली आणि तेव्हापासून तुरुंगवास किंवा विजनवास हेच झेर्झिन्स्कीचे आयुष्य झाले. क्रांतीच्या वेळी तो मॉस्कोतल्या टागान्का कारागृहात शिक्षा भोगत होता. लेनिनने आपली सुटका केली याची भरपाई म्हणून झेर्झिन्स्कीने आपली निष्ठा लेनिनच्या पायांवर वाहिली.

बोल्शेव्हिक क्रांतीचा लोहपुरुष म्हणून झेर्झिन्स्की वावरू लागला. ट्रॉटस्की, स्टॅलिन आदी लेनिनचे सहकारी दिवसा हिंडत असत, लोकात मिसळत असत. झेर्झिन्स्की मात्र अंधार झाला की बाहेर पडे. कोणीही आपल्या फार जवळ येता कामा नये याची तो काळजी घेई.

नव्या समाजरचनेचा आराखडा तयार करण्यासाठी बोल्शेव्हिक नेते स्मोल्नी-मधल्या लेनिनच्या कचेरीत जमले होते. देशात त्या वेळी गोंधळाचे आणि अनिश्चित-तेचे वातावरण होते. त्यामुळे नव्या समाजरचनेचे आपले हे धाडस कितपत यशस्वी होईल यासंबंधी लेनिनचे काही सहकारी साशंक होते. सोव्हिएट सत्ता स्थिर करण्यासाठी नव्या समाजरचनेचा पुकारा करणे आवश्यक आहे असे लेनिनचे मत होते. तो आपली योजना तावातावाने समजावून देत होता. शब्दांची वलये साकारत होती. परंतु आपल्या या शब्दांना कृतीचा आधार देणारे सामर्थ्य कोठे आहे हे एकटचा लेनिनलाच ठाऊक होते. एका अंधाऱ्या कोपऱ्यात झेर्झिन्स्की डोळे मिटून बसला होता. समोरच्या रस्त्यावरून स्मोल्नीवर सोडलेला प्रकाशझोत आपल्या चेहऱ्यावर येणार नाही याची तो नेहमीच दक्षता घेत असे. लेनिनच्या शब्दांची भिस्त झेर्झिन्स्कीच्या खिशातील पिस्तुलावर होती. स्मोल्नीचे संरक्षण करण्याची जबाबदारी लेनिनने झेर्झिन्स्कीवर सोपविली होती ती या विश्वासापायीच. स्मोल्नी-बाहेर लक्षावधी लोक असे आहेत की ज्यांचा लेनिनच्या राजवटीला विरोध आहे ही वस्तुस्थिती झेर्झिन्स्कीला माहीत असल्यामुळे त्याने स्मोल्नीच्या खिडक्यांमध्ये मशीनगन सदैव सज्ज ठेवल्या होत्या.

एकदा स्मोल्नीमध्ये सोव्हिएट प्रतिनिधींची बैठक भरली असताना झेर्झिन्स्कीने असा हुकूम काढला की स्मोल्नीमध्ये हजर असलेल्या प्रत्येकाने तपासणीसाठी आपल्या पुढे येऊन उभे राहावे. ज्यांनी हा हुकूम पाळण्याचे नाकारले त्यांना झेर्झिन्स्कीने अटक केली. इमारतीच्या प्रत्येक दरवाज्यापाशी आणि जिन्यापाशी झेर्झिन्स्कीचे लेटिश पहारेकरी गस्त घालीत उभे होते. एखादा माणूस तपासणीसाठी हजर झाला की झेर्झिन्स्कीचे प्रश्न तयार असत–' तू कोण आहेस ? तुझं संपूर्ण नाव आणि पत्ता

काय ? क्रांती–आंदोलनात गेली किती वर्षं तू भाग घेत आहेस ? तू बोल्शेव्हिक पक्षाचा सभासद आहेस काय ? स्मोल्नीमध्ये कशासाठी येत असतोस ? तुला या इमारतीची कितपत माहिती आहे ? तू प्रामाणिक कार्यकर्ता आहेस याबद्दल कोण हमी देऊ शकेल ?'

हा प्रश्नांचा मारा संपला की ज्यांचा झेर्झिन्स्कीला संशय येई त्यांचे खिसे तपासण्यात येत होते. अशा रीतीने झडतीचे काम आटोपल्यानंतर ज्यांच्या बोल्शेव्हिक-निष्ठेविषयी झेर्झिन्स्कीला शंका उरली नव्हती त्यांना प्रवेशपत्रिका देण्यात आल्या. काही जणांना ' पुन्हा येथे येऊ नका ' अशी ताकीद दिली गेली तर ज्यांचे वर्तन आक्षेपार्ह वाटत होते त्यांना अधिक तपासासाठी तुरुंगात नेण्यात आले. स्मोल्नीमध्ये येणाऱ्या प्रत्येकावर गुप्त पाळत ठवण्यात येऊ लागली.

झेर्झिन्स्कीने लेनिनच्या आदेशानुसार २० डिसेंबर रोजी ' चेका ' ही गुप्त पोलिस संघटना उभारली. आतापर्यंत जगाने कधीही अनुभवला नव्हता असा पाशवी दहशतवाद लेनिनच्या आशीर्वादाने आकार घेऊ लागला. ' चेका'ची पुढे ' ओ. जी. पी. यू. ', ' एन. के. व्ही. डी. ', ' एम. व्ही. डी. ', ' के. जी. बी. ' अशी नावे बदलत गेली तर मूळ हेतू मात्र तसाच कायम होता.

लेनिन आणि झेर्झिन्स्की यांच्या युतीतून कम्युनिस्ट राजवट आणि गुप्त पोलिस संघटना हे अद्वैत जन्माला आले.

आपल्या हाताखालच्या लेटिश पोलिसांसमोर बोलताना झेर्झिन्स्की म्हणाला, ' भाषणे करायला आपल्याला वेळ नाही. कारण अद्याप क्रांती धोक्यात आहे. आपण विरोधकांची फार गय करतो असं मला वाटतं. देशात ठिकठिकाणी क्रांतीचे शत्रू उठावाची तयारी करू लागले आहेत. म्हणून आपल्याला जर क्रांती जिवंत ठेवायची असेल तर आपण निर्घृणपणे शत्रूचा नायनाट केला पाहिजे. न्याय कोणता आणि अन्याय कोणता याचा विचार करण्याची आपल्याला गरज नाही. सर्व प्रतिक्रांतिकारकांचा नाश होईपर्यंत आपण आपली तलवार म्यान करता कामा नये. शत्रूचा बंदोबस्त करण्याचं काम उद्यावर ढकलून चालणार नाही. ते काम आजच हाती घेतले पाहिजे. आज नव्हे, आताच. '

यानंतर ' चेका 'च्या दहशतवादाचा नंगा नाच सुरू झाला.

कोणाही व्यक्तीचा किंचितही संशय आला की त्या व्यक्तीने नव्या राजवटीविरुद्ध म्हणजेच पर्यायाने जनतेविरुद्ध कट केला आहे, अशी आवई उठविली जाई. विरोधकांना कंठस्नान घालण्यासाठी आतुर असलेली लेनिनची तलवार सदैव धारदार ठेवण्याचे काम झेर्झिन्स्की मनोभावे करीत होता. दिवस असो वा रात्र असो, झेर्झिन्स्कीचे पोलिस कोणावर धाड घालतील याचा नेम उरला नव्हता.

विशेषत: रात्रीच्या वेळी झेर्झिन्स्कीचे हस्तक शहरभर हिंडून कोठे काय चालले आहे याची वित्तंबातमी मिळवीत. रात्रभरच्या भटकंतीत पकडलेले लोक पहाटेच्या सुमारास स्मोल्नीमध्ये आणले जात आणि मग त्याचे काय होणार आहे हे एकटया झेर्झिन्स्कीला माहीत असावयाचे. झेर्झिन्स्कीच्या तावडीत सापडलेल्या माणसाला न्यायालयात उभे राहण्याचीदेखील संधी मिळत नसे. स्मोल्नीतून त्याला दूरवरच्या पोलीस–कोठडीत नेले जाई आणि तेथे त्याच्यावर बिनबोभाट पिस्तूल चालविण्यात येई. पिस्तुलाचा आवाज बाहेर लोकांना ऐकू जाऊ नये म्हणून मुद्दाम त्या वेळी मालमोटारींचा खडखडाट सुरू केला जाई.

रशियासारख्या मागासलेल्या देशात लेनिनची हुकुमशाही स्थिर करावयाची असेल तर एक बोट बंदुकीच्या चापावर ठेवूनच वागले पाहिजे असे झेर्झिन्स्कीचे मत होते. आब्रामोव्हिच या आपल्या मित्राशी बोलताना झेर्झिन्स्की म्हणाला होता, 'समाजातील आपल्याला नको असलेले वर्ग बंदुकीच्या सामर्थ्याने नष्ट केल्याशिवाय आपल्याला हवी असलेली समाजरचना अस्तित्वात येणार नाही.'

झेर्झिन्स्कीचा दहशतवाद दिसून येई आणि म्हणून लोक त्याला शिव्याशाप देत असत. परंतु या दहशतवादाच्या पडद्याआडचा सूत्रधार लेनिनच होता हे जाणकारांना माहीत होते. किंबहुना झेर्झिन्स्कीचा बेछूट दहशतवाद हाच लेनिनच्या हुकुमशाहीचा सर्वांत मोठा आधार होता.

लेनिन स्वभावाने इतका असहिष्णू होता की अगदी लहानसहान विरोधही त्याला सहन होत नसे. कोणी सरकारविरोधी पत्रके वाटली तरी त्याला तेथल्या तेथे गोळ्या घाला असा त्याचा हुकूम होता. लोक रस्त्यावर जमले एवढ्या कारणावरून त्यांच्यावर पूर्वसूचना न देता गोळीबार करण्याचीही लेनिनने झेर्झिन्स्कीला मुभा दिली होती. इमावेव्ह येथील एका शेतकऱ्याने लष्करी कर वेळेवर भरला नाही म्हणून त्याला मानेभोवती दगड बांधून नदीत सोडण्यात आले.

केवळ विरोधकांनाच नव्हे तर चोर, गुंड आदी समाजविघातक प्रवृत्तींनाही ठेचले पाहिजे असा लेनिनचा आग्रह असे. तो म्हणायचा, 'चोरांना जागच्याजागी गोळी घालून ठार केल्याशिवाय कोणतीही क्रांती यशस्वी होत नाही असा आजवरचा इतिहास सांगतो. हुकुमशाही ही पोलादी सत्ता आहे. तिने विचार करायचा नसतो. चोर असो वा आणखी कोणी असो त्याला क्रांतिकारकाच्या आवेशाने ठार केले पाहिजे.'

कोण चोर आहे आणि कोण साव आहे हे हुकुमशहाने ठरवायचे असते ही गोष्ट वेगळी.

आपल्या सहकाऱ्यांनीदेखील सामुदायिक दडपशाही केली पाहिजे असा लेनिनचा आग्रह असे. २६ जून १९१८ रोजी झिनोव्हेव्हला धाडलेल्या पत्रात लेनिन लिहितो–

'व्होलोडारस्कीच्या खुनाचा बदला घेण्यासाठी सामुदायिक दहशतवाद अवलंबण्याचा 'कामगारां'चा विचार होता. परंतु तुम्ही लोकांनी कामगारांना तसं करू दिलं नाही असं मला कळलं आहे. ही गोष्ट खरी असेल तर मी तुमचा धिक्कार करतो. आपण सारे बैठकीत सामुदायिक दहशतवादाचे गोडवे गात असतो आणि वेळ आली की लोकांना अडवितो. आपण असं वागलो तर क्रांतिकारक आपल्याला काय म्हणतील? सध्याची परिस्थिती युद्धसदृश आहे. आपण कोणालाही दयामाया न दाखविता, जो कोणी म्हणून आपला शत्रू आहे त्याच्याविरुद्ध लोकांना पेटवत राहिलं पाहिजे.

लेनिनचे हे विचार ऐकून त्याचे सहकारी बोल्शेव्हिक मंत्रीदेखील घाबरून जात. त्यांनादेखील झेर्झिन्स्कीची भीती वाटू लागे.

मंत्रिमंडळाची बठक चालू असताना लेनिनने झेर्झिन्स्कीकडे चिठ्ठी धाडून सध्या किती प्रतिक्रांतिकारक तुरुंगात आहेत यासंबंधी विचारणा केली. लेनिनपुढं कागद ठेवून झेर्झिन्स्की म्हणाला, 'जवळजवळ पंधराशे.'

लेनिनने कागदावर जथे स्थानबद्धांचा आकडा लिहिला होता तेथे लहानशी फुली करून कागद झेर्झिस्कीला परत केला. तो कागद घेऊन झेर्झिन्स्की काहीही न बोलता लेनिनच्या कचेरीतून बाहेर पडला. लेनिनने त्या कागदावर काय लिहिले आहे याची किंवा काहीही न बोलता झेर्झिन्स्की तरातरा बाहेर का गेला याची चौकशी करण्याची त्या वेळी तेथे हजर असलेल्यांपैकी कोणासही गरज वाटली नाही. परंतु दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्र वाचल्यानंतर सारेच मंत्री हबकून गेले. सर्वच्या सर्व म्हणजे पंधराशे स्थानबद्धांना फाशी देण्याचा झेर्झिन्स्कीने हुकूम काढला असल्याची बातमी त्या दिवशीच्या वृत्तपत्रांमध्ये ठळक रीतीने प्रसिद्ध करण्यात आली होती.

या हत्याकांडाचा दोष आपल्याकडे येऊ नये म्हणून लेनिनने आपली वैयक्तिक चिटणीस फोटियेव्हा हिच्यामार्फत खुलासा करण्याची व्यवस्था केली होती. फोटियेव्हा सांगू लागली, 'हा सारा प्रकार गैरसमजुतीतून घडला आहे. पंधराशे स्थानबद्धांना फाशी द्यावे असे लेनिनने झेर्झिन्स्कीला मुळीच सांगितले नव्हते. झेर्झिन्स्कीने पुढे केलेला कागद आपण वाचला आहे याची खूण म्हणून लेनिनने त्या कागदावर स्थानबद्धांच्या आकड्याशेजारी फुली केली. त्याची ही खूण म्हणजे स्थानबद्धांना फाशी देण्याचा हुकूमच आहे अशी झेर्झिन्स्कीची कल्पना झाली आणि त्यामुळे हा प्रकार घडला.

लेनिन आणि झेर्झिन्स्की यांच्यातील किरकोळ 'गैरसमजा'बद्दल पंधराशेजणांना आपल्या प्राणांची किंमत मोजावी लागली.

ब्रेस्टलिटोव्हस्क येथे आपल्या अटीवर रशियाला तह करावयास भाग पाडण्यासाठी जर्मन सैन्य पुन्हा युद्धाच्या पवित्र्यात उभे राहिले होते तेव्हा पेट्रो-

ग्राडलाही धोका निर्माण झाला होता. आपला प्रच्छन्न शत्रू इतका जवळ असताना राजधानी पेट्रोग्राड येथे ठेवणे इष्ट होणार नाही याची जाणीव होऊन लेनिनने बोल्शेव्हिक सरकारची राजधानी मॉस्कोला हलविण्याचे ठरविले.

लेनिन मॉस्कोला जावयास निघण्यापूर्वी पेट्रोग्राड–मॉस्को रस्त्यावर आणि खुद्द मॉस्कोमध्ये लेनिनच्या सुरक्षिततेची व्यवस्था करण्यासाठी झेर्झिन्स्की मॉस्कोला गेला. लेनिन ज्या आगगाडीतून मॉस्कोला जाणार आहे ती गाडी उडवून टाकण्याचे सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी कार्यकर्त्यांनी ठरविले असल्याची अफवा पसरली असल्यामुळे झेर्झिन्स्कीने सर्वत्र आपले गुप्त पोलीस पेरले होते. लेनिनने बाँख–ब्रुयेव्हिचला सांगितले, 'आपण कोणत्या दिवशी मॉस्कोला जाणार आहोत यासंबंधी कुणालाही कळता कामा नये. नाहीतर होतं काय, कुणीतरी सहज बोलून जातं आणि मग सारा कार्यक्रम बिघडतो.'

मॉस्कोमध्ये पोचताच झेर्झिन्स्कीने 'चेका 'च्या कचेरीसाठी सोइस्कर जागा शोधण्यास प्रारंभ केला. लुबिआन्का रस्त्यावरची. रॉयल इन्शुरन्स कंपनीची इमारत सर्व दृष्टींनी सोयीची होती. '२२, लुबिआन्का रस्ता ' हा 'चेका 'च्या मॉस्कोतील कचेरीचा पत्ता होता. त्यामुळे पुढे कोणालाही धाक दाखविण्यासाठी '२२, लुबिआन्का रस्ता ' या पत्त्याची आठवण करून दिली जाई.

सोव्हिएटच्या सदस्यांना मॉस्कोला नेण्यासाठी दोन खास आगगाड्यांची योजना करण्यात आली होती. यात सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षासह सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते होते. प्रत्येक डब्यामध्ये सर्व पक्षांचे सदस्य असतील अशा रीतीने बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पहिला डबा मात्र प्रामुख्याने सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी सदस्यांसाठी राखून ठेवण्यात आला होता. बोल्शेव्हिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व व्यवस्था झाली आहे ना याची लेनिनने बाँख–ब्रुयेव्हिचकडून खात्री करून घेतली. बाँख–ब्रुयेव्हिच म्हणाला, 'बोल्शेव्हिकांना ठार करण्यासाठी ही गाडी उलथून पाडण्याचा सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाकडून आता मुळीच प्रयत्न होणार नाही. कारण आपण जर का तसं केलं तर आपलेच सहकारी ठार होतील हे त्यांना कळलेलं आहे.'

१० मार्च १९१८ रोजी रात्री साडे नऊ वाजता लेनिन मॉस्कोमधून बाहेर पडला आणि मोटारीतून स्टेशनवर आला. लेनिनसाठी जो डबा राखून ठेवलेला होता त्यातील दिवे लावण्यात आले नव्हते. अंधाऱ्या डब्यातच लेनिनने प्रवेश केला. लेनिन गाडीत बसल्याचे कळताच गार्डाच्या डब्यात बसलेल्या एका मंत्र्याने सिग्नल दिला आणि नेहमीची शिट्टी न वाजविता गाडी सुरू झाली.

लेनिनने बाँख–ब्रुयेव्हिचला विचारले, 'आपण सारी रात्र अंधारातच काढणार आहोत काय?'

'गाडी पेट्रोग्राडबाहेर गेली की या डब्यातले दिवे लावले जातील.'

थोड्या वेळाने लेनिनचे सहकारी या डब्यात आले आणि पुढच्या कार्यक्रमासंबंधी त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. प्रत्येक स्टेशनवर झेर्झिन्स्कीचा अधिकारी येऊन सर्व काही ठीक असल्याची खबर लेनिनपर्यंत पोचवी.

११ मार्चला सकाळी सात वाजता गाडी मॉस्को स्टेशनात शिरली. स्टेशनवर लेनिनच्या स्वागतासाठी मॉस्को सोव्हिएटचे प्रतिनिधी आलेले होते. त्यांनी हॉटेल नॅशनलमध्ये लेनिनची तात्पुरती व्यवस्था केली होती.

दुसऱ्या दिवशी लेनिन थोडा वेळ आपल्या बहिणीकडे—मारिआकडे—जाऊन आला आणि नंतर तो तडक क्रेमलिनमध्ये गेला. दरवाज्यावरच्या लष्करी अधिकाऱ्याने लेनिनची मोटार अडवीत विचारले, 'तुम्ही कोण आहात ?'

'आपले प्रधानमंत्री व्लादिमिर इलिच लेनिन'—बाँख ब्रुयेव्हिचने माहिती पुरविली

हे शब्द ऐकताच तो अधिकारी दोन पावले मागे सरकला आणि त्याने लेनिनला लष्करी थाटाचा सलाम केला. हसत हसत हात उंचावून लेनिनने त्या अभिवादनाचा स्वीकार केला.

क्रेमलिनमधल्या तिसऱ्या मजल्यावरची जागा लेनिनसाठी निवडण्यात आली होती. तीन लहान खोल्या, स्वयंपाकघर, स्नानगृह आणि नोकरासाठी एक वेगळी खोली एवढी ही जागा होती. लेनिनला कोठेही ताबडतोब फोन करता यावा म्हणून स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. लेनिनच्या निवासावर सतत लक्ष राहील अशा रीतीने इमारतीच्या तळमजल्यावर चोवीस तास पहारा बसविण्यात आला.

रशियाचा नवा सर्वसत्ताधीश क्रेमलिनमध्ये स्थानापन्न झाला.

क्रेमलिनमध्ये राहावयास आल्यानंतर लेनिनने बोल्शेव्हिक पक्षाची परिषद बोलाविली. या परिषदेत बोलताना लेनिन म्हणाला, 'खाजगी व्यापार बंद करण्याचे आम्ही ठरविले आहे. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुसार काम करावे आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेइतके मिळावे. हे साम्यवादाचे मूल तत्त्व अमलात आणण्याच्या दृष्टीने कसोशीचे प्रयत्न केले जातील. कारखान्यात राबणारे कामगार आणि जमिनीचा लहानसा तुकडाही ज्यांच्या मालकीचा नाही असे शेतकरी यांच्या सहकार्याच्या बळावर नवी बोल्शेव्हिक राजवट आपला कार्यक्रम यशस्वी करील असा मला विश्वास वाटतो. सामाजिक गरजा ध्यानात घेऊनच उत्पादनाची आखणी होईल. साम्यवादाच्या प्रस्थापनेसाठी मधला दलाल नाहीसा केला पाहिजे.'

परिषद आटोपल्यानंतर लेनिन ट्रॉटस्कीला म्हणाला, 'येत्या सहा महिन्यांच्या आत मी रशियन समाजवाद आणतो याबद्दल तू आता निर्धास्त राहा.'

खाजगी व्यापार बंद करण्याचे कारणही तसेच घडले होते. कागदी चलनावर लोकांचा विश्वास उरला नसल्यामुळे शेतकरी शहरातील व्यापाऱ्यांकडून अन्नधान्याच्या बदल्यात औद्योगिक मालाची मागणी करीत होते. नागरी जनतेला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शहरे आणि खेडेगावे यांच्यात वस्तूंच्या बदली वस्तू अशी विनिमय पद्धत सुरू करणे सरकारला आवश्यक वाटले. अन्नधान्ये आणि उत्पादित वस्तू यांचे प्रमाण ठरविण्यासाठी प्रत्येक शहरात समित्या स्थापन करण्यात आल्या. व्यापाऱ्यांजवळील सर्व मालाची नोंद करण्यात येऊन या मालाच्या खरेदी-विक्रीवर सरकारी नियंत्रण बसविण्यात आले.

परंतु एवढे करूनही हा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. कारण अन्नधान्याच्या मानाने रशियाचे औद्योगिक उत्पादन खूपच अपुरे होते. म्हणून १० मे १९१८ रोजी बोल्शेव्हिक सरकारने एक हुकूम काढून श्रीमंत शेतकऱ्यांजवळील धान्य आपल्या ताब्यात घेण्याचा अधिकार प्राप्त केला. या हुकमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक खेडेगावात एकेक समिती स्थापन करण्यात आली. ' गरीब सहायक समिती ' या गोंडस नावाखाली या समित्या वावरू लागल्या. सर्वत्र संशय, हेरगिरी आणि फसवणूक यांना ऊत आला. जो तो दुसऱ्यावर पाळत ठेवू लागला. सरकार या समित्यांमार्फत आपल्या हालचालींवर नजर ठवीत आहे हे कळल्यानंतर शेतकरी-वर्ग चिडला आणि त्याने सरकारला धान्य देण्याऐवजी धान्य पिकवणेच बंद केले. ठिकठिकाणी शेतकऱ्यांचे दंगे सुरू झाले. झेर्झिन्स्कीच्या ' चेका 'ने गोळीबारांचे सत्र सुरू करून या दंग्यांचा बीमोड केला.

नागरी स्वातंत्र्याची मुस्कटदाबी, घटना समितीचे विसर्जन, ' चेका 'चा दशहतवाद, ब्रेस्टलिटोव्हस्क येथील शरणागती, शेतकऱ्यांवरील जबरदस्ती या सर्व प्रकारांमुळ रशियन लोकमानस बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध संतप्त झाले. रोव्हनो, राझान, कोस्ट्रोमा, पेर्म, त्वेर, पेन्झा आदी भागांमध्ये शेतकरी आणि लालसैनिक यांच्यांत चकमकी उडू लागल्या. केवळ शेतकरीवर्गच सरकारवर चिडला होता असे नव्हे. तुला, मिन्स्क, स्मोलेन्स्क, सॅरानोव्ह आणि अल्ताय इत्यादी शहरांतील कामगारही दंग्यात सहभागी झाले. ' चेकां 'च्या गोळीबाराला न घाबरता खुद्द पेट्रोग्राड शहरातही पावांच्या टंचाईमुळे कामगारवर्ग सरकारविरोधी निदर्शने करू लागला. एकटा डावा सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्ष सोडला तर इतर सर्व राजकीय पक्षांनी लेनिनच्या हुकुमशाहीविरुद्ध आवाज उठविला. समाजवादी आणि उदारमतवादी पक्षातील काही सदस्यांनी लेनिनला विरोध करण्यासाठी ' रशिया पुनर्निर्माण संघ ' स्थापन केला. ज्यांचा समाजवादाला सरळ विरोध होता ते ' मध्यममार्गी उजवे ' या नावाने एकत्र आले. हे ' मध्यममार्गी उजवे ' काही प्रमाणात जर्मनीचे पक्षपाती असल्यामुळे त्यांनी लेनिनची राजवट उलथून पाडून पुन्हा झारशाही स्थापन करण्याच्या इराद्याने पेट्रो-

ाड आणि मॉस्को येथील जर्मन प्रतिनिधींशी बोलणे सुरू केले. ' मध्यममार्गी उज-यां 'चे लक्ष जर्मनीकडे होते तर ' रशिया पुनर्निर्माण संघा'चे सदस्य इंग्लंड, फ्रान्स ाणि अमेरिका या लोकशाही राष्ट्रांची मदत घेऊन रशियात लोकशाही निर्माण रण्याची इच्छा बाळगीत होते. जर्मनीविरुद्धच्या डावपेचांना पूर्व युरोपात आधार ापडावा म्हणून पाश्चात्य राष्ट्रांनी या ' पुनर्निर्माण संघा 'ला मदत करण्याचे ठर-वले. या सुमारास ' राष्ट्रीय केंद्र ' म्हणून आणखी एक गट उदयाला आला. तो परा-ाष्ठेचा जर्मन–द्वेष्टा असल्यामुळे त्यानेही ब्रिटन–अमेरिकेकडे मदतीचे आवाहन केले. शियातील बोल्शेव्हिक राजवट आणि जर्मनी या दोहोंविरुद्ध झुंजणाऱ्या शक्तींनी, ाश्चिमात्य राष्ट्रे तुम्हाला लष्करी मदत करण्यास तयार आहेत असे रशियातील ेंच राजदूत नोलेन्स यांच्यामार्फत 'पुनर्निर्माण संघा 'ला आणि ' राष्ट्रीय केंद्रा 'ला ळविल्यामुळे या दोन्ही संघटनांचा उत्साह वाढला होता. अल्पावधीतच लेनिनची ुकुमशाही आपण खाली खेचू हे स्वप्न पाहण्यात ही मंडळी मशगुल झाली होती.

•

रशियातील घटनांकडे जपानचेही लक्ष होतेच. असंख्य जर्मन आणि ऑस्ट्रियन युद्धकैदी सैबेरियात ठेवण्यात आलेले होते. युद्धकाळात ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका यांनी आपला शस्त्रास्त्रांचा आणि दारूगोळयाचा साठाही या भागातच ठेवला होता. जर्मन युद्धकैद्यांनी उठाव करून ही शस्त्रास्त्रे व दारूगोळा आपल्या ताब्यात घेतला तर पूर्व रशियन प्रदेशावर स्वामित्व प्रस्थापित करणे जर्मनीला सहज शक्य होईल या भीतीने जपानने सैबेरियातील व्लाडिवोस्टोक आदि बंदरां-मध्ये आपले सैन्य उतरविले. जर्मनीचे संकट दूर करण्याच्या मिषाने पुढे आलेला जपान सैबेरियावर आपले नियंत्रण प्रस्थापित करील हे ओळखून त्याला विरोध करण्यासाठी १९१८ च्या जुलैमध्ये ब्रिटिश आणि अमेरिकन सैन्य मुरमान्स्क आणि आर्चएंजल या ठिकाणी उतरले.

या सुमारास आणखी एक घटना अशी घडली की रशियातील चेक युद्धकैद्यांना सैबेरिया प्रशांत महासागर या मार्गाने फ्रान्समध्ये धाडण्याची रशियाने व्यवस्था करावी अशी ब्रिटन व फ्रान्स यांनी मागणी केली. लागलीच, चेक युद्धकैद्यांची रशियाने आपल्या प्रदेशातून पाठवणी केली तर रशियाने ब्रेस्ट लिटोव्हस्क येथील कराराचा भंग केला आहे असे, आपण मानू. असे जर्मनीने रशियाला कळविले. जर्मनीला दुखविणे बोल्शेव्हिकांना आताच परवडण्यासारखे नव्हते. म्हणून लगेच चेक युद्धकैद्यांना निःशस्त्र करा असा युद्धमंत्री ट्रॉटस्कीने आपल्या सैनिकांना हुकूम दिला. रशियन सैनिक आपल्या जवळची शस्त्रास्त्रे काढून घेण्यासाठी येत आहेत, असे कळताच चेक युद्धकैद्यांनी बंड करून काही स्थानिक रशियन अधिकाऱ्यांना कोंडून टाकले.

चेक युद्धकैद्यांनी बंड करण्याचे धाडस करावे हे पाहून लेनिन संतापला. त्याने

लागलीच रोसेनगोल्ट्झला चेक–युद्धकैद्यांच्या बंदोबस्तासाठी रवाना केले. रोसेनगोल्ट्झ बरेच सैन्य घेऊन आला असल्यामुळे चेक युद्धकैद्यांचा निरुपाय झाला. जर्मन सरकारच्या दडपणापुढे मान तुकवून बोल्शेव्हिक राजवटीने चेक युद्धकैद्यांवर अन्याय केला म्हणून या चेक युद्धकैद्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे सोशॅलिस्ट रेव्होल्यशनरी पक्षाने ठरविले. त्यासाठी विसर्जित घटना समितीमधील या पक्षाच्या सदस्यांनी पुढाकार घेऊन लोकसेना नावाचे स्वयंसेवक दल उभारण्याचे कार्य हाती घेतले. उरलमधील कोसॅक लोकसेनेत दाखल झाले. त्यामुळे साहजिकच लोकसेनेचे सामर्थ्य वाढले आणि तिने व्होल्गाच्या तीरावरील समारापासून प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावरील व्लाडिवोस्टोकपर्यंतच्या विशाल भू-प्रदेशावर अल्पावधीत आपले स्वामित्व प्रस्थापित केले. त्यातच डॉन विभागात अॅलेक्सेव्ह आणि कोर्निलेव्ह या निवृत्त सेनापतींनी श्वेतसेना उभारून बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध दंड थोपटले.

रशियात सर्वत्र असंतोषाचा आणि बंडाचा वणवा पेटला.

बोल्शेव्हिकांनी प्रथम श्वेतसैन्याचा बीमोड करण्याचे ठरविले. दहा हजार लाल सैनिक डॉन विभागाकडे रवाना झाले. या भागातील शेतकरीवर्गाला कोर्निलेव्ह आणि अॅलेक्सेव्ह यांच्या संबंधी ममत्व वाटत नसल्यामुळे ग्रामीण भागातून श्वेतसैन्याला पाठिंबा मिळाला नाही आणि त्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. स्वतः कोर्निलेव्ह या चकमकीत ठार झाला. दोन महिन्यांनंतर जनरल डेनिकीनने श्वेतसैन्याची पुन्हा उभारणी सुरू केली. डेनिकीनच्या लोकप्रियतेमुळे श्वेतसैन्याचे सामर्थ्य वाढू लागले. जूनमध्ये या सेनेत अवघे बारा हजार स्वयंसेवक होते. पण ऑक्टोबरमध्ये ही संख्या एक लाखावर गेली आणि त्यामुळे डॉन विभागावरच्या दोनशे मैल लांबीच्या आघाडीवर डेनिकीन घट्ट पाय रोवून उभा होता.

५ जुलैला यारोस्लाव्हल येथील सेनाधिकाऱ्यांनी बोरिस साविनकोव्हच्या नेतृत्वाखाली लेनिनविरुद्ध उठाव केला. ट्रॉटस्कीने या अधिकाऱ्यांना पकडण्यासाठी जे सैन्य धाडले त्याच्यावरच पराभवाची पाळी आली. शेवटी जर्मन युद्धकैद्यांची मदत घेतल्यानंतर साविनकोव्हचा बीमोड करणे ट्रॉटस्कीला शक्य झाले. उठाव करणारे ४२८ अधिकारी हाती पडताच त्यांना फाशी देण्यात आले.

आतापर्यंत बोल्शेव्हिकांच्या पाठीशी उभा राहिलेला डावा सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षही आपला विरोधी आवाज उठवू लागला. शेतकऱ्यांजवळील धान्य जप्त करणारी पथके रद्द करा, लाल स्वयंसैनिकांचे विसर्जन करा, चेका ही गुप्त पोलिस संघटना अस्तित्वात राहता कामा नये, चेक युद्धकैद्यांना न्याय्य वागणूक मिळावी आणि जर्मनी-विरुद्ध युद्ध सुरू करावे अशा आपल्या पाच मागण्या बोल्शेव्हिक राजवटीने मान्य केल्या पाहिजेत असा डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाने आग्रह धरताच लेनिनने

या पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्यांना तुरुंगात टाकून हा आवाज बंद पाडला. परंतु त्यामुळे या पक्षाच्या गुप्त कारवायांना जोर चढला. हा पक्ष कट्टर जर्मनीविरुद्ध होता. रशियातील जर्मन वकिलातीवर हल्ला चढवावा व नंतर बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध सशस्त्र उठाव करावा या दृष्टीने या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हालचाली सुरू झाल्या. ६ जुलै १९१८ रोजी ब्लुमकान नावाच्या डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी कार्यकर्त्याने मॉस्कोतील जर्मन राजदूत काउंट मिरबाख याचा खून केला.

एवढे करूनच डावे सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी थांबले नाहीत. त्यांनी सैनिकांच्या आणि काही बंडखोर 'चेका' पथकांच्या मदतीने झेर्झिन्स्कीला अटक करून मॉस्कोतील अनेक सरकारी इमारतींचा ताबा घेतला. यात तार कचेरीही त्यांच्या हाती पडली. लागलीच डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी तारा करून लोकांना बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन केले

तार कचेरी हातातून गेली असली तरी टेलिफोन कचेरी मात्र लेनिनच्या हातात होती. त्याने तातडी करून मॉस्कोतील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना क्रेमलिनमध्ये बोलावले आणि त्यांच्या दिमतीला सैन्य देऊन मॉस्कोतील उठाव मोडून काढला. झेर्झिन्स्कीचीही सुटका करण्यात आली.

डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचा मॉस्कोतील उठाव अल्पावधीत फसला असला तरी ग्रामीण भागात या पक्षाचा प्रभाव असल्यामुळे अद्याप बंडाचा धोका टळलेला नाही हे बोल्शेव्हिकांना माहीत होते.

स्टॅलिन त्या वेळी त्सारित्सिन (नंतरचे स्टॅलिनग्राड) येथे होता. लेनिनने त्याला तार केली–'मॉस्कोतील उठाव आम्ही अत्यंत कठोर उपाय योजून एका रात्रीत मोडून काढणार आहोत. आपण आता अंतर्गत यादवी युद्धाच्या काठावर उभे आहोत. म्हणून आपण आपल्याजवळ असलेल्या सर्व सामर्थ्याचा वापर करून आपल्या शत्रूंचा नायनाट केलाच पाहिजे. तू त्या भागातील लोकांना आपला हा निर्धार कळव.'

स्टॅलिनने लेनिनला कळविले–' जे कोणी आपल्याविरुद्ध जातील त्यांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी आपला हात कधीही थरथरणार नाही. शत्रूला कसे वागवावयाचे असते हे आपल्याला ठाऊक आहे. आपण आता तसेच वागू या. '

स्टॅलिन लेनिनच्या तालमीत तयार झालेला असल्यामुळे त्याला लेनिनची भाषा अचूक कळत होती. भविष्यकाळात तो लेनिनच्या भाषेतच आपल्या विरोधकांना उत्तर देणार होता. (क्रमशः)




# नेतृत्वातील नवा ' विजय ' मांजरेकर

महाराष्ट्राने बडोदा आणि सौराष्ट्राचा संपूर्ण पराभव करून अठरा गुण पटकावले आणि पश्चिम विभागीय विजेतेपदासाठी मुंबईच्या बरोबरीने गुण मिळविले. या दोन्ही सामन्यांत महाराष्ट्राचे कर्णधार जर विजय मांजरेकर नसते तर कदाचित् अठराच्या अठरा गुण आम्हांस गमवावे लागले असते.

महाराष्ट्र जुन्या मांजरेकरांना ओळखतो तो एक उत्साही यष्टिरक्षक, भरंवशाचा समर्थ फलंदाज, उत्तम क्षेत्ररक्षक आणि फटकळ गृहस्थ म्हणून ! पण यंदा विजय मांजरेकर यांच्या क्रिकेटपटुत्वातील एक नवा पैलू आम्हांला आढळून आला आणि तो म्हणजे त्यांचे जीगीषु नेतृत्व ! वालचंदनगर येथे बडोद्याविरुद्ध झालेल्या ' रणजी करंडक ' सामन्यात मांजरेकरांचे संघनायकत्व विशेष दृष्टोत्पत्तीस आले नाही. कारण एक तर बडोद्याचा संघ फारच कमकुवत होता आणि पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने त्यांच्यावर पहिल्या डावात सहज मात केली. उलट सौराष्ट्राने बडोद्याला जिंकले होते आणि सौराष्ट्राचा महाराष्ट्राविरुद्धचा सामना पुण्यात होता. पुण्याच्या ' चिकित्सक ' प्रेक्षकांनी मांजरेकरांची बरोबर दाद घेतली.

मनोहर रेगे

पहिल्या दिवशी महाराष्ट्राने ६ बाद ४४६ धावा रचल्या. त्यांत मांजरेकरांनी नाबाद २४० धावा टोलविल्या. शेवटच्या षटकांत (११० षटके) धावांची सरासरी षटकाला चारावर नेऊन महाराष्ट्राने बोनस गुण पटकविला तो मांजरेकरांच्याच हिकमतीने आणि कौशल्याने. दुसऱ्या दिवशी सौराष्ट्राने ६ बाद २५८ धावा केल्या व तिसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजता सौराष्ट्राचा संघ ३५६ धावांत संपला. ९० धावांची महाराष्ट्राला आघाडी मिळाली. २३० मिनिटे खेळ उरला होता आणि सामना अनिर्णित राहणार हे जवळजवळ नक्की झाले होते.

पण उपाहारापर्यंतच्या वीस मिनिटांत एकोणतीस धावा जमल्या आणि एकूण ८७ मिनिटांत १५१ धावा झाल्यावर महाराष्ट्राने दुसरा डाव सोडला. सौराष्ट्राला सबंध सामना जिकण्यासाठी १४२ मिनिटांत २४२ धावा करावयाच्या होत्या. पण मांजरेकरांनी अन्वर शेख, अकलखखान, कीर्तने आणि सलढाणा यांचा अशा युक्तीने वापर केला की लगेच त्याचा पडताळा मिळाला. फलंदाजांचा वकूब ओळखून त्यांनी गोलंदाजीत सतत बदल केले. निरनिराळे क्षेत्रव्यूह रचले. कित्येक वेळा एकेक षटकातच एकेक गोलंदाज बदलून टाकला. या वेळी महाराष्ट्राचे क्षत्ररक्षण अगदी 'दिव्य' झाले. दुसऱ्या दिवशी ८ व तिसऱ्या दिवशी ५ झेल सुटले. प्राध्यापक देवधर म्हणतात की, केवळ एखादा आंधळाच झेल सोडील पण इथे तर चांगले डोळस क्षेत्ररक्षक होते! लढत महाराष्ट्र व सौराष्ट्र यांत चालली होती, की मांजरेकरांचे नेतृत्व आणि महाराष्ट्राचे क्षेत्ररक्षण यांत चालली होती हेच काही काळ समजेना. तरीही न कचरता आणि न कुरकुरता मांजरेकरांनी सौराष्ट्राचा दुसरा डाव ११९ धावांत संपुष्टात आणला आणि सामना निर्णायक जिंकला.

चेतन चव्हाण, निकी सलढाणा आणि ज्ञानेश्वर आगाशे हे फलंदाज आणि अन्वर शेख व अकलखखान हे गोलंदाज हाताशी घेऊन विजय मांजरेकर यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले हे महाराष्ट्राचे नशीबच म्हटले पाहिजे! महाराष्ट्राने मुंबईच्या गुणसंख्येत बरोबरी केली. हा केवळ, मांजरेकरांच्या नेतृत्वाचाच ठणठणीत विजय होय यात संशय नाही. ●

---

दक्षिण जपानमधील फुकौका गावी ऑस्ट्रेलियाच्या दरेक क्लेटन या पंचवीस वर्षांच्या तरुणाने मॅरॅथॉन शर्यतीत २ तास, ९ मिनिटे आणि ३६·४ सेकंद वेळ घेऊन दुसरी आंतर-राष्ट्रीय 'भगीरथ धाव' जिंकली. पूर्वीचा विक्रम जपानच्या मोरिओ शिगेमात्सु या तरुणाने १९६५ मध्ये विंडसर येथे केला होता. २ तास, १२ मिनिटे वेळ त्याने घेतला.

---

## वेरुळ ... ... ......[ पृष्ठ ११ वरून



विजयी झेप आणि हिरण्यकश्यपूची कोसळू शकत असलेली अहंता यांच्या सहज चित्रणाने या शिल्पाला अपूर्व नाटय आणि गती प्राप्त झाली आहे.

दशावतार लेण्यातील सुंदर मूर्ती म्हणजे शिवपार्वती-विवाहाचा प्रसंग दाखविणारे शिल्प. पार्वतीच्या रूपाने भारतीय वधूचे मार्मिक चित्रण यथील कलावंताने केले आहे. नववधूच्या मुखावरील लज्जेचे, विनयाचे व संभ्रमाचे भावतरंग येथील कलावंताने कुशलतेने व्यक्तविले आहे.

लेणे क्रमांक २१ हे रामेश्वर या नावाने ओळखले जाते. हे लेणेही भारतीय शिल्पाचे एक अपूर्व दालन आहे. या लेण्यात मकरावर उभी असलेली गंगेची मूर्ती सौंदर्याचे एक अपूर्व रूपडे आहे. सुबकता, तरलता या शिल्पगुणांना येथे कमनीयता आणि शालीनता यांची जोड मिळाल्यामुळे ही चारुगात्री प्रेक्षकांचे चित्त हिरावून घेते. याच लेण्यातील शालभंजिकांच्या वृक्षदेवतांच्या मूर्तीही तितक्याच कमनीय आहेत. या शालभंजिकांचे केशकलाप, अलंकार, वस्त्रे आणि त्यांची शरीरसंपदा लक्षवेधी आहे.

ब्राह्मणी लेण्यांपैकी १६ वे लेणे म्हणजेच जगप्रसिद्ध श्री कैलास होय. पण श्री कैलासचे दर्शन आपण शेवटी घेऊ या. तत्पूर्वी जैन शैलमंदिरात आपण दाखल होऊ.

### तीर्थंकार दर्शन

बौद्ध आणि ब्राह्मणी लेणी मागे टाकून जैन लेण्यांत प्रवेश केल्यावर प्रेक्षकाला आपण एका वेगळ्या वातावरणात आलो असल्याचा साक्षात्कार होतो. वेरुळ येथील जैन लेण्यांत भव्यपणा नाही पण भारतीय कलाकुसरीचा हव्यास बघायचा असल्यास आपणांस येथेच यावे लागेल

येथील तीर्थंकाराची शिल्पे ही ब्राह्मणी शिल्पांसारखीच महाकाय आहेत. परंतु तोचतोपणा व निर्जीव ताठपणा यांमुळे तीर्थंकाराची शिल्पे कलात्मक दृष्टया थोडी डावीच ठरतात. सिद्धयिका व मातंग या यक्ष व यक्षिणी यांची रूपके मात्र उत्कृष्ट उतरली आहेत.

जैन लेण्यांमधील शिल्पात कलाकुसर व अलंकरण यांनी चरणसीमा गाठली आहे. जगन्नाथ सभेतील सिद्धयिका आणि मातंग यांच्या मूर्तींच्या बरोबरच दोघांच्या

डोक्यावरील फळे व पक्षी यांचे रेखाटन म्हणजे शिल्पसौंदर्याची परमावधी होय !

" आता अवधरा कथा गहन । जे सकळा कौतुका जन्मस्थान ।
की अभिनव उद्यान । विवेक तरूचे ।
ना तरी सर्व सुखांची आदि । जे प्रमेयमहानिधी
नाना नवरस सुधाब्धि । परिपूर्ण हे ।
ना तरी सकळ धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार
लावण्य रत्नभांडार । शारदेचे "

या शब्दांत गीतेचे माहात्म्य विशद करीत असताना ज्ञानेश्वरांच्या दृष्टीपुढे वेरुळची शिल्प-सृष्टीच तरळत असेल असा तर्क करायचा मोह आवरता आवरत नाही.

देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनी डोंगरू
ऐसा भक्तीचा व्यवहारू । न व्हावा !

या ओळीतच 'अमृतानुभवाचा' ठसा रसिक श्रोत्यांच्या मनावर कोरणाऱ्या ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेले 'लावण्य रत्न भांडार' वेरुळ सोडून दुसरे कुठे असणार !

## श्री कैलास

राष्ट्रकूट नृपती शुभतुंग कृष्ण ह्याने उत्तरभारतात केलेल्या दिग्विजयाच्या स्मरणार्थ 'कैलास' या नावाने ओळखले जाणारे शिवालय आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत कोरले.

ख्रिस्तोत्तर ८ व्या आणि ९ व्या शतकांत भारतीय सार्वभौमत्वासाठी राष्ट्रकूट, प्रतिहार आणि पाल या तीन राजघराण्यांची स्पर्धा चालू होती. बंगालचे पाल, कान्यकुब्जचे प्रतिहार आणि महाराष्ट्रातील राष्ट्रकूट या त्रिदलीय संघर्षात अखेर राष्ट्रकूटांची सरशी होऊन भारतीय सार्वभौमत्वाची जयमाला दक्षिणापथाच्या गळ्यात पडली. राष्ट्रकूटांच्या नौबतीचा डिमडिम घोष सतत दोन वर्षे भारताच्या आसमंतात घुमत होता.

कांची, महाबलिपुरम्, बदामी, मदुरा आदी दक्षिणेतील सत्ताकेंद्रांचे हरण केल्यानंतर उज्जैनी, प्रयाग आणि कान्यकुब्ज येथील सत्ताधिष्ठितांशी चार हात करून शुभतुंग कृष्णाने आपले सामर्थ्य अजमावले असावे.

गोदाकाठच्या अश्वदलाच्या विजयी पताका पूर्वी सातवाहनांच्या काळात आणि पुढे पुलकेशिन् चालुक्याच्या काळात दशार्ण आणि अवंती महाजनपदात फडकल्या होत्या. परंतु यक्ष, किन्नर, गंधर्व आणि देवता यांचे निवासस्थान असलेल्या नगाधिराज हिमालयाच्या शैल शिखरांना गोदेच्या लेकरांचा पराक्रम जवळून बघण्याचा प्रसंग राष्ट्रकूट काळातच आला. कृष्णा आणि गोदा ह्यांच्या उदकाने शुभतुंग कृष्ण राजाने जेव्हा नगाधिराज हिमालयाला अर्घ्यप्रदान केले तेव्हा भारतीय इतिहासाच्या

क्षितिजावर एक नवी झळाळी उमटली. या रोमहर्षक प्रसंगाची स्मृति चिरंतन राहावी म्हणून शुभतुंग कृष्णाने सह्याद्रीच्या एलापुरस्थित डोंगरात कैलासचे शिवालय कोरून काढले. वेरुळच्या कैलासच्या निर्मितीची अशी ही तेजस्वी पार्श्वभूमी आहे.

प्राचीन भारतात मंदिरस्थापत्याच्या दोन परंपरा होत्या. एक बांधीव रचनेची (Structural) आणि दुसरी शैलशिल्पाची (Rock–cut). आठव्या शतकात या दोन्ही परंपरा परिपक्व अवस्थेला पोचल्या होत्या. शैलशिल्पाची परंपरा महाराष्ट्रात विशेष जोपासली गेली होती. कार्ले, कान्हेरी, जुन्नर, अजिठा, वेरुळ, पितळखोरे येथील शैलगृहांत या परंपरेचे ऐश्वर्य प्रत्ययास येते.

दक्षिणेत बांधीव रचनेची मंदिरे ऐहोळी, पत्तडीकल व कांची या केंद्रांत उभारली गेली होती. पत्तडीकल येथील विरूपाक्ष मंदिर हे आठव्या शतकातील एक स्थापत्य कृत्य म्हणून गणले जाते.

राष्ट्रकूटाच्या सैन्याने कर्नाटक पादाक्रांत केल्यानंतरच शुभतुंग कृष्णाची दृष्टी उत्तर भारताकडे वळली असावी. उत्तर आणि दक्षिण या दोन्ही भारतात राष्ट्रकूटांनी घेतलेल्या दिग्विजयाच्या स्मरणार्थ विरुपाक्ष मंदिराचा आराखडा घेऊन वेरुळच्या डोंगरात 'कैलास' शिवालय कोरायचे ह्यात इतिहासाचे एक औचित्य शुभतुंग कृष्णराजाने साधले.

शैल शिल्पाच्या पद्धतीने बांधीव मंदिर प्रकार खडकात कोरून काढण्याचा अपूर्व प्रयोग करून शुभतुंग कृष्णाने शैलस्थापत्याचा परमोच्च बिंदू गाठला. शैलस्थापत्याचा मुक्काम यापुढे जाऊच शकत नव्हता. शैलस्थापत्य आणि शिल्प या कलामाध्यमात जीवनाची पुनरुभारणी करण्याचे जेवढे म्हणून सामर्थ्य आहे ते सर्व कैलास घडविताना येथील कलावंतांनी पणास लावले.

## भारतीय संस्कृतीचे विराट दर्शन

कैलास हे हिमालयातील एक उत्तुंग शिखर. उमा-महेश्वर ह्यांचे हे निवासस्थान. वेरुळ डोंगराच्या उतरणीवर एक प्रचंड एकसंध मंदिर आतून आणि बाहेरून कोरून काढून कैलासची स्थापना सह्याद्रीच्या एका फाटयावर करायची ही कल्पनाच केवढी भव्य. ज्या क्षणी आणि ज्या कलावंताच्या मनात ही कल्पना सर्व प्रथम आली असेल तो क्षण आणि तो कलावंत धन्य होत !

डोंगराच्या एका प्रचंड कडेतून शिवालय कोरून काढून त्यात सहस्रावधी रूपकांची वर्दळ सजवून दख्खनदेशाच्या कारागिरांनी ब्रह्मांडाला गवसणी घालणारा उद्योग करून ठेवला आहे.

या शिवालयाच्या स्थापत्याचा थोडक्या शब्दांत पण नीटस परिचय महाराष्ट्राचे एक थोर पुरातत्त्ववेत्ते श्री. म. न. देशपांडे ह्यांनी एके ठिकाणी घेतला आहे त्यात काही सुधारणा करणे अशक्यच आहे म्हणून त्यांच्याच शब्दांत—

" हे मंदिर एका प्रचंड अधिष्ठानावर उभे आहे. पाच विमानांमध्ये विमानां-सहित मुख्य गर्भगृह आहे. गर्भगृहासमोर छोट अंतराळ व समोर सभामंडप. या मंडपाला तिन्ही बाजंस प्रवेशमंडपे आहेत. पैकी पुढचा अग्रमंडप; या मंडपासमोर नंदीमंडप व त्याच्यासमोर गोपुर आहे. मात्र अग्रमंडप, नंदीमंडप आणि गोपुर हे स्वतंत्र असून एकमेकांना पुलाने जोडलेले आहेत. नंदीमंडपाच्या दोहो बाजूंस एक-संघ दोन प्रचंड ध्वजस्तंभ आहेत. या स्तंभांची उंची सुमारे ५० फूट असून मुख्य मंदिराची तळापासूनची उंची ९६ फूट आहे. मुख्य मंदिराच्या मंडपात जाण्यासाठी नंदीमंडपाच्या दोहो बाजूंस दोन सोपान आहेत. अधिष्ठानामध्ये हत्ती, सिंह, व्याळ इत्यादींची सुंदर शिल्पे ओळीने कोरली आहेत. जणू काही या हत्तींच्या व सिंहांच्या पाठींवर हे कैलासावरील शिवधाम उभे राहिले. मुख्य मंदिराचे विमान द्रविड पद्धतीचे त्रितल म्हणजे तीन मजली आहे व त्यावर मंदिराचा कळस आहे. सर्व मंदिर ज्या एका विस्तीर्ण प्रांगणामध्ये कोरले आहे. त्याची लांबी २७ फूट व रुंदी १५४ फूट असून पाठीमागच्या बाजूस १०७ फूट कडा खोदून हे प्रांगण निर्मिले आहे."

कैलास मंदिरात कोपऱ्या कोपऱ्यात रूपकांची वर्दळ आहे. कुठेही बघा, कुणी-कडेही न्याहाळा—चैतन्याने जिवंत झालेली रूपके रसिकांचे चित्त आपल्याकडे खेच-तात. येथील स्त्री-पुरुष, देव-देवता, यक्ष-किन्नर, गंधर्व-दानव, पशु-पक्षी विलक्षण गतिमान आहेत.

महाराष्ट्राचे एक उदयोन्मुख कलासमीक्षक प्रा. देगलूरकर ह्यांच्या शब्दांत, 'अर्जुनाला विश्वरूपदर्शन झाल्यावर तो जसा भांबावून गेला होता तसाच कैला-सातील अनेकविध शिल्पे पाहून प्रेक्षकही भांबावून जातो. इथे आकाश-पाताळ आहे, जन्म-मृत्यू आहे, इथे बाल्य, तारुण्य, जरा आहे. मानव इथे आहे व दानवही आहे. इथे शांत रसाचा परिपोष आहे, रौद्र रसालाही इथे आवाहन आहे. इथे वीर रस फुलला आहे व शृंगारालाही अवकाश ठेवला आहे. इथे नाही काय हाच प्रश्न आहे. इथला अणूरेणू शिल्पमय आहे.'

## काही प्रभावी शिल्पे

'कैलास'मधील गजासुरवधाचे शिल्प अतिशय प्रभावी आहे. गजासुराचा वध करणारा शिव साऱ्या ब्रह्मांडाला आपल्या रौद्ररूपाने भयाकुल करीत आहे. महा-काय शिवाने जणू सारे ब्रह्मांड व्यापून टाकले आहे. सर्पाच्या दोरीने आवळलेल्या पिंजारलेल्या जटा सैरावैरा धावत असून, त्याच्या गळ्यातील मुंडमाला बेभान फिरत आहे. शिवाच्या मुद्रेत विश्वातील सर्व सामर्थ्य एकवटले आहे. शेजारी कमलासनावर पार्वती मोठ्या विस्मयाने आणि आतुरतेने शिवाचा हा वैश्विक पराक्रम बघत बसलेली आहे. या शिल्पातील भव्यता, आवेग व रौद्रता प्रेक्षकाला खोलवर जाणवते.

त्रिपुरांतक शिव, कालाटी शिव या शिल्पपटांमध्ये शिवाचे रौद्ररूप व्यक्त होते तर नटराज शिवाचे लालित्यपूर्ण दर्शन विविध नृत्यमुद्रांतील शिल्पांतून घडते.

कैलास मंदिराची वास्तू ज्या चौथऱ्यावर उभी असल्याचे दाखविण्यात आले आहे त्या आलिंदाखाली कैलास हलविणाऱ्या रावणाचा शिल्पपट म्हणजे एक विराट दृश्य आहे.

या शिल्पपटाच्या खालच्या भागात कैलासाच्या शिखराला गदगदा हलविण्याचा राक्षसी प्रयत्न करीत असलेला रावण आपल्या वीसही हातांनिशी दाखविण्यात आला आहे. ही विश्वात्मक उलथापालथ करू पाहणाऱ्या रावणाच्या भुजांमध्ये प्रचंड सामर्थ्य एकवटले आहे.

रावण देत असलेल्या धडकांनी कैलासाच्या शिखराला धक्के बसत आहेत. घाबरलेली पार्वती देवदेवेश्वराचा आश्रय घेऊ बघत असून एक सेविका तर घाबरून पळ काढीत आहे. या उलट शिव शांतपणे बसलेला दाखविला आहे. कैलासावरील या सर्व हालचाली आणि रावणाचा खटाटोप इतक्या कौशल्याने रेखाटण्यात आला आहे की, हा प्रसंग आपल्या या शिल्पात छायाप्रकाशाच्या खेळाचा उपयोग कलावंतांनी कौशल्याने करून घेतला आहे. खुद्द रावण हा अंधाराच्या खाईतून प्रकटत असून शिखरावरील घाबरलेली सेविका अंधाराच्या गाभ्यात पळून जात आहे असे दर्शविल्यामुळे या शिल्पाला प्रचंड उठाव मिळालेला आहे. पुराणातील कथानकाचे एवढे नाटयपूर्ण व प्रभावी रेखाटन इतरत्र कुठेही बघावयास मिळत नाही.

सहस्रावधी देव-देवता, यक्ष-गंधर्व, किन्नर, पशु-पक्षी, लता-वृक्ष यांनी आणि अनेक रोमहर्षक रमणीय कथानकांनी गजबजलेल्या वेरूळच्या शिल्पसृष्टीचे यथायोग्य रसग्रहण करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथच हवा. येथे जे लिहिले ते वानगीदाखल. 'कैलास' संचलनासाठी याल तेव्हा कातळाच्या अनिर्वाच्य गाभ्यातून जी बोलकी रूपके बाहेर पडली आहेत ती बघून एका जुन्या कवीच्या ओळी तुमच्याही ओठांवर येतील.

> "एलापुराचलगताद्भुतसन्निवेशं यद्वीक्ष्य विस्मितविमानचरामरेन्द्राः ।
> एतत्स्वयंभु शिवधाम न कृत्रिमे श्रीर्दृष्टे दृशीति सततं बहु चर्चयन्ति ।।
> भूयस्तथाविधकृतौ व्यवसायहाने रेतन्मया कथमहो कृतमित्यकस्मात् ।
> कर्तापि यस्य खलु विस्मयमाप शिल्पी तन्नामकीर्तनमकार्यत यन राज्ञा ।।

"विमानातून जाणाऱ्या देवांनी कैलासाचे लेणे पाहिले आणि येथील सौंदर्य पाहून विस्मित झालेले देव चर्चा करू लागले, इतके सुंदर देवालय कृत्रिम असणे शक्यच नाही. कारण कृत्रिम गोष्टींमध्ये इतके सौंदर्य कसे बरे दृग्गोचर होईल ! असा विस्मय देवांना पडला. तर ज्या शिल्पीने हे घडविले तो याहिपेक्षा विस्मयचकित झाला. अशा प्रकारचे मंदिर पुन्हा कोरण्याचा असफल प्रयत्न केल्यावर तो म्हणाला की ही कलाकृती मी कशी बरे केली !"

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## फेब्रुवारी महिन्याचे भविष्य

**मेष :** झुंजार प्रवृत्तीच्या मेषराशी व्यक्तींना आव्हान देणारी ग्रह-संघटना अंतरिक्षात निर्माण व्हायला लागलेली आहे, ती कडे दुर्लक्ष करून चालणार नाही. व्ययस्थानी श. रा. मं. हे सारे उग्र ग्रह जमू लागलेले आहेत. त्यांची दखल घ्यायची इतक्यात गरज नाही. पण सदैव दक्ष राहायला हवे.

विज्ञान–कला–अर्थशास्त्र यांशी या महिन्यापासून आपला घनिष्ठ संबंध यायला लागेल. अपेक्षेप्रमाणे यशही पदरी पडेल. फेब्रुवारी मध्यकाळी विरोधकांच्या कारवाया सुरू होतील. आणि त्यामुळेच आपला प्रगतीचा वेग काहीसा मंदावल्यासारखा वाटू लागेल. अपयश, अपेक्षाभंग असे काही घडणार नाहीच. पण कोणत्याही क्षणी स्फोटक परिस्थती निर्माण होणे शक्य आहे. दि. ५ ते ९, १८ ते २१, २३ ते २९.

**वृषभ :** गेल्या कित्येक महिन्यांपासून आपण एका कार्यासाठी अविश्रांत प्रयत्न करीत आहात. झपाटल्यासारख वागत आहात. आता या वेळी मंगळाची सहानुभूती लाभताच आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्यात.

लाभस्थानी श. मं. रा. सारेच परकीय. परकीयांचे सहकार्य लाभू लागेल, परप्रांतीयांची सहानुभूती सतत लाभू शकेल.

या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून जीवनातील उत्क्रांतिपर्वाला प्रारंभ होणार आहे. नवे जीवन–नवा विचार–नवे वातावरण असे अनुभवण्यास मिळू लागेल.

व्यापारधंद्यात नोकरीचाकरीत – जे आपले कार्यक्षेत्र असेल त्यात विक्रम करून दाखवाल. उत्साहाला उधाण येईल, दि. ३ ते ६, १७ ते २३, २५ ते २९

**मिथुन :** आपल्या भाग्यस्थानाकडे अनेक समर्थ ग्रहांची वाटचाल सुरू आहे. ते आपणांस पैसा-प्रतिष्ठा-यश हवं ते देऊन जातील. फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात माझ्या या म्हणण्याचा आपणांस बव्हंशी प्रत्यय येईल.

या महिन्यापासून आपले जीवन गतिमान बनेल, क्रान्तिकारक विचाराने झपाटले जाल. अभिनव-आकर्षक-रम्य–प्रसन्न याचा आदर्श जगापुढे ठेवू शकाल. अगदी गणिताच्या काटेकोर भाषेत बोलावयाचे झाल्यास असे सांगू शकेन की, १८ फेब्रुवारीच्या शुक्र-हर्शल-त्रिकोणापासून आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हायला लागतील. नैराश्य, माघार, अपयश हे सारे शब्द आपण आता विसरू शकता.

दि. ५ ते ९, १७ ते २१, २७ ते २९ या कालाचे महत्त्व अनन्यसाधारण ठरेल.

कर्क : मंगळ भाग्यात आला—आता आपणांस सर्वत्र प्रसन्न आणि आशादायक वातावरण दिसू लागेल. कित्येक दिवसांपासून हरवलेले स्वास्थ्य निश्चित गवसेल

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. नवे विचार, नव्या योजना घेऊन प्रगतीकडे वाटचाल करू लागाल. घोळ घालीत बसणे, आता परवडण्यासारखे नाही.

यांत्रिक, वैद्यकीय, व्यवसायांतील व्यक्तींनी येथून पुढे सदैव आघाडीवरच राहवे अशीच नियतीची इच्छा दिसते. प्रतिष्ठा उंचावेल, प्रज्ञा विकसेल, प्रतिभा बहरेल. कलावंतांना तर याच्याइतका अनुकूल काळ यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळालेला असेल. दि. ३ ते ९, १७ ते २३, २६ ते २८. महत्त्वाचा काल.

सिंह : गुरूसारख्या ग्रहाचे कृपाछत्र असूनही मंगळाने तुम्हांला फारसे पुढे सरकू दिले नाही. आता तर ८ फेब्रुवारीला त्याचे अष्टमस्थानी आगमन घडणार आहे. आपली वेगवान प्रगती रोखली जाते की काय, याची भीती वाटू लागेल. पण अशा बारीकसारीक गोष्टींना डरणे, तुमच्या रक्तातच नाही. सतत पुढे हाच तुमचा महामंत्र!


**डोंगरे अप्सरा हेअर ऑईल** तर्फे होणाऱ्या

**" नववधू प्रियदर्शिनी केशभूषा "**

स्पर्धेत भाग घेऊन आकर्षक बक्षिसे मिळवा

**स्पर्धेची ता. २३ फेब्रुवारी १९६८**

षण्मुखानंद हॉल, मुंबई नं. २२

*आकर्षक बक्षिसे*

१. बजाज कुकिंग रेंज ओव्हनसहित
२. एवरेस्ट वॉशिंग मशीन
३. मर्फी ट्रान्झिस्टर रेडिओ
४. रिको डोमेस्टिक मिक्सर
५. इलेक्ट्रिकल हेअर ड्रायर
६. बजाज मोठा प्रेशर कुकर
७. इलेक्ट्रिकल कॉफी परकोलेटर
८. बजाज लहान प्रशर कुकर
९. बजाज डीलक्स ॲटोमॅटिक इस्त्री इलेक्ट्रिकल
१०. बजाज डीलक्स टोस्टर

प्रवेशपत्रिका भरून पाठविण्याची शेवटची तारीख १ फेब्रु. १९६८

*प्रवेश-पत्रिका अप्सराच्या बाटलीबरोबर मिळेल.*

बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्याकरिता फक्त

**के. टी. डोंगरे आणि कं, पुणे प्रा. लि.**

८२, नगीनदास मास्तर रोड, मुंबई नं. १

या वेळी कोणत्याही गोष्टीचा झटपट निर्णय घ्या आणि पुढे पाऊल टाका—ते पाऊल पवित्र्यातच पडेल. विरोधक आडवे आले तर ठोकरून काढा.

या वेळी प्रगतीचे एक नवे क्षेत्र हस्तगत होईल. तिथे अडथळे येतील, विरोधकही भेटतील, पण तुमचे प्रगतीचे त्रैराशिक मात्र चुकू शकणार नाही.

दि. ५ ते १०, १८ ते २३, २७ ते २९ या कालातील यशाबद्दल निश्चित राहा.

**कन्या :** गुरु-शनी तुमच्यावर काहीसे नाराजच आहेत आणि अशा वेळीच मंगळाची सहानुभूती आपण गमावून बसणार आहात. दिवस काहीसे धावपळ, धडपडीचे दिसतात. निष्ठा, निर्धाराची नितांत गरज भासेल अशाच वेळी.

तुमच्या साहसी मनोवृत्तीला आता आवर घालावा लागेल. न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या उचलण्याचे टाळावे लागेल. पण याचा अर्थ असा नव्हे की, या वेळी काही न करता स्वस्थ बसावे. सूर्याचे तेज तुमच्या पाठीशी उभे आहेच. काहीसे जुळतेमिळते घेऊन सारे व्यवहार करायची तयारी ठेवलीत तर, कोणत्याही कार्यांत अपयशाची भीती नाही. साहित्य, नाट्य, काव्य-संगीत या क्षेत्रांतील कलावंतांना तर या काळी अनंत प्रगतीच्या संधी लाभतील.

दि. ७ ते ११, १७ ते २१, २५ ते २७ या काली अपेक्षा सफल व्हाव्यात.

**तूळ :** या वेळी तुमचा प्रगतीचा मार्ग रोखण्याची शामत कोणातही नाही. ग्रहांची संपूर्ण अनुकूलता, प्रयत्नांची शिकस्त आणि योग्य व्यक्तींचे सहकार्य एवढे सर्व लाभलेले असताना, कोणत्याही कार्यात घवघवीत यश मिळणे मुळीच अवघड नाही. कित्येक दिवसांनी इतका अनुकूल काल तुमच्या वाट्यास येत आहे.

चित्रपटसृष्टीतील कलावंतांना एकदम प्रसिद्धीला येण्याचे भाग्य लाभेल, अनपेक्षित धनलाभाचे प्रयत्न करणाऱ्यांनाही हे दिवस वाईट नाहीत. अधिकाधिक यश लाभेल दुसऱ्या पंधरवड्यात. आपल्या कर्तृत्वाला दाही दिशा अपुऱ्या पडू लागतील.

यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रांतील व्यक्तींनाही विशेष कार्य करून दाखविण्याची संधी लाभेल. दि. १८ फेब्रुवारीच्या आसपासचा काल-परमोत्कर्षाला पोषक ठरेल.

**वृश्चिक :** चौथ्या मंगळाची जुलमी कारकीर्द संपुष्टात आली आणि पाचव्या मंगळाच्या यशस्वी कारकीर्दीस प्रारंभ झाला. जीवनातील एक क्रांतिकारक काल सुरू होत आहे.

साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळू लागेल. विरोध, संघर्ष, कटुता संपुष्टात यायला लागल. नव्या आशा अंकुरायला लागतील आणि १८ फेब्रुवारीपासून अनपेक्षितपण प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. फेब्रुवारीचा मध्यकाल उत्तुंग यशाचा-अनपेक्षित लाभाचा जाणवेल.

सूर्य चतुर्थात येताच थोड्याफार स्थावराच्या भानगडी निर्माण व्हायला लागतील.

दि. ३ ते ८, १२ ते १८, २२ ते २६ या काळी अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडावे.

**धनू :** मंगळासारखा स्फोटक ग्रह सुखस्थानी आला आहे—येत आहे ही अवस

चांगली तर नव्हेच. पण भाग्यस्थ गुरूचे कवच लाभलेल्या व्यक्तीवर तिचा फारसा परिणाम होणार नाही. निर्धार निष्ठेचे व्रत घेतलेल्या उपासकांना सहसा कोणताच ग्रह छळण्याचे धाडस करू शकत नाही.

दुसऱ्या पंधरवडयात सूर्य पराक्रमस्थानी येताच तुम्हांला कोणाचीही डर नाही. तुमची अंगीकृत कार्ये गतिमान बनू लागतील. थोरांचे कोणत्याही क्षणी सहकार्य लाभू लागेल. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्यात अशा जिद्दीने वागू लागाल.

१८ फेब्रुवारीच्या आसपासचा काल अनपेक्षित प्रगतीचा जाणवेल.

दि. १ ते ६, ९ ते ११, १७ ते २७ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा.

**मकर :** मंगळ पराक्रमस्थानी (८ फेब्रु.) येताच तुमच्या साऱ्या व्यथा-विवंचना मिटतील. तो तुम्हांला पैसा, प्रतिष्ठा, घवघवीत यश, हवं ते देऊन जाईल. असा पर्वकाल २ वर्षांनी फक्त एकदाच येत असतो. या वेळी आपण आपल्या कार्यक्षेत्रात आवाज उठवाल, सारे हितशत्रू सैरावैरा धावू लागतील. न होणारी कामे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी, फारसे परिश्रम न करताही होऊ लागतील. मंगळाचे सामर्थ्यच असे आहे.

राजकीय क्षेत्रातील तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल, व्यवसायधंद्यांतील नवे तंत्र अपेक्षेबाहेर यशस्वी ठरेल.

या वेळी आपल्या कर्तृत्वाला दाही दिशा अपुऱ्या पडतील.

दि. ३ ते ८, १७ ते २१, २४ ते २९ या कालात आपण मनात आणाल ते घडून येईल.

**कुंभ :** तुमच्या राशीतून मंगळ पसार झाला. पीडा गेली. मन आता प्रसन्न व उत्साही बनू लागेल. कौटुंबिक कटुता, व्यावसायिक विवंचना मिटून जाईल.

वैज्ञानिक क्षेत्रात, यांत्रिक उद्योगधंद्यांत १७-१८ फेब्रुवारीपासून क्रांती घडवून आणू लागाल. तुमच्यांतील सुप्त कर्तृत्वाला जाग येईल, प्रतिभा बहरेल, प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

एकाएकी स्थानांतर घडेल आणि त्या स्थानांतरामुळेच नवी प्रगती दृष्टिक्षेपात येईल. आता आपणांस साडेसातीची बाधा होण्याची भीती नाही. पैशाअडक्याचा प्रश्न थोडाफार अवघड जाणवेलही पण त्यामुळे फारसे कुठे नडणार नाही.


दि. ५ ते ८, १० ते १३, १८ ते २१ या काली अनेक समस्या सुटतील.

**मीन :** मंगळाचे राश्यंतर घडल्याने (८ फेब्रु.) तुमच्या परिस्थितीत फारसा फरक पडेल अशी सोइस्कर कल्पना करून घेऊ नका. मीन राशीत श. रा. मं.—सारे उग्र ग्रह जमू लागलेले आहेत. काहीही त्रास न देता जातील असे म्हणणे म्हणज वदतोव्याघातच !

पहिला पंधरवडा थोडाफार यशाचा—स्वास्थ्याचा जाणवेल, दुसऱ्या पंधरवडयात सूर्य व्ययस्थानी येताच अनेक अडीअडचणी तीव्र स्वरूप धारण करू लागतील, परिस्थिती आटोक्याबाहेर जाते की काय याची भीती वाटू लागेल व कृतीही ठीक राहणार नाही. या वेळी काहीही न करण्यासारखा शहाणपणा नाही.

दि. २ ते ६, १७ ते २१, २४ ते २७ थोडेफार स्वास्थ्याचे दिवस एवढेच. ●

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**